BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
2.0

BMM
मराठी
शाळा

## पुस्तक चौथे




# विश्वभारती

## मराठी बोला वाचा लिहा

# बृहन्महाराष्ट्र मंडळातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सचित्र कार्यपुस्तिका

## विश्वभारती पुस्तक चौथी

मराठी भाषा कार्यपुस्तिका  दुसरी आवृत्ती - २०२३
पहिली आवृत्ती  - २०१४

**बृहन्महाराष्ट्र मंडळ २.० पुस्तक समिती**
**उत्तर अमेरिका**
**संपर्क:** shala@bmmonline.org

Recommendation: Age 13-14 eligible for level 4. Minimum two year gap between two level exams and/or 120/80 instruction hours are recommended. This helps to prepare the students better and overall studentship retains. Normally a teacher needs 120/80 hours minimum (60/40 hours per academic year) to teach the entire syllabus (based on eBook of the particular level). Rarely do students grasp the syllabus in a shorter time. Age is approximate only. This varies on each student’s progress, older aged students’ progress fast for primary levels.

# कार्यपुस्तिके विषयी मनोगत

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने महाराष्ट्राच्या बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्यासाठी उपयोगी अशी विश्वभारती कार्यपुस्तिका प्रकाशित करताना आम्हाला फार आनंद होत आहे.

भाषा ही संस्कृतीशी निगडित असते. त्यामुळे मराठी संस्कृतीशी रोजचा संपर्क नसलेल्या विद्यार्थ्यांना मराठी कसे शिकवायचे याचा विशेष विचार करावा लागतो. यासाठी या स्वतंत्र कार्यपुस्तिकेचा खटाटोप.

BMM च्या सर्व शाळांसाठी जो एकसंध अभ्यासक्रम २००७ मध्ये तयार केला गेला त्याच अभ्यासक्रमावर प्रस्तुत ही कार्यपुस्तिका आधारित आहे. ह्या कार्यपुस्तिके मध्ये काल्पनिक कथा (fiction), माहितीपर उतारे (non-fiction), नाटुकले , बडबड गीत, कविता  असे अनेक मुलांच्या दृष्टीने योग्य साहित्यप्रकार समाविष्ट केले आहेत. विद्यार्थ्यांना अनेक विषयांशी निगडीत शब्दसंपदा देता यावी हा त्यामागे उद्देश आहे. त्याचबरोबर निरनिराळ्या प्रसंगांचा वापर करून व्याकरणाचे प्रयोग शिकवणे, वर्गात विद्यार्थ्यांशी गप्पा मारण्यासाठी विषय पुरवणे हे देखील उद्देश आहेत. परंतु धड्यातली माहिती घोकून पाठ करून घेणे हा मात्र आमचा उद्देश मुळीच नाही.

ह्या कार्यपुस्तिकेमध्ये  विद्यार्थी प्रश्नांची उत्तरे  तिथल्या तिथेच लिहू शकतील. पालकांना मुलांची तयारी करून ठेवता येईल. वर्षभरात शिकवलेला आणि उत्तरे लिहिलेला संपूर्ण अभ्यास एकाच ठिकाणी असेल तर पाल्याची परीक्षेची तयारी करून घेणे सोयीचे होते हे गेल्या काही वर्षांच्या अनुभवातून लक्षात आले आहे. सतत संगणकाचा वापर मुलांनी टाळावा व पुस्तकाचा वापर करावा यासाठी केलेला प्रयत्न पालकांना नक्कीच आवडेल.

ह्या संपूर्ण प्रक्रियेत आमच्या बृहन्महाराष्ट्र कार्यकारिणीचे अध्यक्ष संदीप दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यपुस्तिका हा उपक्रम सुरु झाला.

शाळा संचालक सविता मोरे, समितीतील कार्यकर्त्या श्रुती पांडे, मयूरी नाईक, मीनल जोशी, अंजली भिडे, हर्षाला साधले, आरती भागवत, कादंबिनी धारप, अश्विनी देवधर ह्यांनी आपले योगदान दिले आहे. मुखपृष्ठ शीतल रांगणेकर यांनी बनविले आहे. योगासनाचा पाठ श्रीकांत सबनीस, पुनम चिमुरकर व चारुलता जोशी यांनी तयार केला आहे. कार्यपुस्तिकेचे मुद्रितशोधन केले आहे, अश्विनी क्षीरसागर, कादंबिनी धारप, स्नेहल पिटके कुलकर्णी, यांनी. अंतिम फॉन्ट दुरुस्थी, शुद्ध लेखन आणि पेज सेट उप केले आहे, सविता मोरे, अंजली भिडे, यांनी.

इ- बुक्सची editable documents विनायक पर्वते यांनी उपलब्ध करून दिली.

कार्यपुस्तिके साठी हातभार लावणाऱ्या सगळ्यांचे मनःपूर्वक आभार!

विद्यार्थ्यांना वाचायला सोपे आणि रोचक वाटतील, त्यांच्या कल्पनेला चालना देतील आणि उत्कंठा वाढवतील असे धडे लिहायचा आम्ही प्रयन्त केला आहे . मराठीचा अभ्यास हा मुलांसाठी आवडीचा विषय कसा होईल याचा आम्ही प्रयत्न केला आहे . हे करताना भाषेशी तडजोड न करता जास्तीत जास्त सकस मराठीचा वापर व्हावा ही आमची भूमिका आहे. ही अवघड उद्दिष्टे सर्वार्थाने साध्य झालेली नाहीत याची आम्हाला पुरेपूर जाणीव आहे. त्यामुळे हे काम पूर्ण झाले नसून ही फक्त सुरुवात आहे असे आमचे मत आहे. या कामात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षक, पालक आणि मराठी प्रेमींची आम्हाला मदत हवी आहे. आपल्या सूचना आम्हाला अवश्य कळवा. आम्ही त्यांचा पुढील आवृत्तीमध्ये निश्चित उपयोग करू.

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

BMM shala ebook team.

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कार्यपुस्तिके विषयी मनोगत | 3 |
| अनुक्रमणिका | 5 |
| प्रार्थना | 8 |
| पसायदान | 9 |
| अक्षर ओळख | 11 |
| अंक | 13 |
| १ - एक वेगळाच तारा | 18 |
| २ - कपाटातला प्राणी | 22 |
| ३ - बुच ओ’हेअर | 26 |
| ४ - आमचा पाळीव प्राणी | 30 |
| ५ - राणीची बाग | 35 |
| ६ - पत्र | 40 |
| ८ - मकर संक्रांत | 49 |
| ९ - सौर उर्जा - सूर्याची शक्ती | 54 |
| ११ - आजारीपण | 62 |
| १२ - फ्लो जो | 65 |
| १३ - डहाणूची भटकंती | 69 |
| १४ - निसर्ग | 76 |
| १५ - पन्हाळगड - बाजीप्रभूंचे बलिदान | 80 |
| (महाराष्ट्राच्या इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराजांची एक गोष्ट ) | 80 |
| १६ - पॉप फट पॉप | 85 |
| १७ - माझा नवीन मित्र | 89 |
| १८ - खोपा | 93 |
| १९ - विनायक दामोदर सावरकर | 96 |
| २० - प्रदूषण | 99 |
| उजळणी - सराव | 104 |

| | |
|---|---|
| चित्र ३ | 115 |
| अवांतर वाचन | 118 |
| अ १ - मनाचे श्लोक | 118 |
| अ २ - जे का रंजले गांजले | 119 |
| अ ३ - समर्थ रामदास व कल्याणस्वामी | 120 |
| अ ४ - महाभारत | 124 |
| अ ५ - जत्रा | 127 |
| परिशिष्ट: बाराखडी | 130 |
| समाप्त | 134 |

# प्रार्थना

प्रारंभी विनंती करू गणपती, विद्यादयासागरा
अज्ञानत्व हरोनी बुद्धी मती दे, आराध्य मोरेश्वरा
चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघे, देशांतरा पाठवू
हेरंबा गणनायका गजमुखा, भक्ता बहु तोषवी ||



**अर्थ** - प्रारंभी, सुरुवातीला गणपतीला विनंती करूयात, जो विद्येचा सागर आहे, जो आपले अज्ञान हरोनी (अज्ञान दूर करून) आपल्याला बुद्धी देतो, असा आराध्य (पहिला) मोरेश्वर. जो चिंता, क्लेश, दारिद्र्य, दुःख आपल्यापासून देशांतरास (लांब) पाठवतो आणि असा हा हेरंब, गणाचा नायक ,गजमुख असलेला तो आपल्याला तोषवतो (आनंद देतो.)

## पसायदान

आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावें, पसायदान हे ।

जें खळांची व्यंकटी सांडो, तयां सत्कर्मी रती वाढो
भूतां परस्परें पडो, मैत्र जीवांचें ।

दुरिताचें तिमिर जावो, विश्व स्वधर्मसूर्यें पाहो,
जो जें वांच्छील तो तें लाहो, प्राणिजात ।

वर्षत सकळमंगळीं, ईश्वर निष्ठांची मांदियाळी
अनवरत भूमंडळीं, भेटतु भूतां ।

चला कल्पतरूंचे आरव, चेतना चिंतामणींचें गांव
बोलते जे अर्णव, पीयूषाचे ।

चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहीन
ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होतु ।

किंबहुना सर्वसुखीं, पूर्ण होऊनि तिहीं लोकीं
भजिजो आदिपुरुखीं, अखंडित ।

आणि ग्रंथोपजीविये, विशेषीं लोकीं इयें
दृष्टादृष्ट विजयें, होआवें जी ।

तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो , हा होईल दानपसावो
येणें वरें ज्ञानदेवो, सुखिया जाला ।



## अक्षर ओळख

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क (ka) | ख (kha) | ग (ga) | घ (gha) | ङ (gna) |
| च (cha) | छ (cHa) | ज (ja) | झ (za) | ञ (yna) |
| ट (Ta) | ठ (tHa) | ड (Da) | ढ (dHa) | ण (Na) |
| त (ta) | थ (tHa) | द (da) | ध (dHa) | न (na) |
| प (pa) | फ (pHa) | ब (ba) | भ (bHa) | म (ma) |
| य (ya) | र (ra) | ल (la) | व (va) | श (sha) |
| | ष (Sha) | स (sa) | ह (ha) | |
| | ळ (La) | क्ष (kSha) | ज्ञ (dnya) | |

अ(a) आ(aa) इ(e) ई(ee) उ(u) ऊ(oo) ए(a) ऐ(ai) ओ(o) औ(ou)
अं(um) अ(aha)

क(ka) का(kaa) कि(ki) की(kee) कु(ku) कू(koo)

के(kay) कै(kai) को(ko) कौ(kou) कं(kum) कः(kaha)

# अंक

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | | | १३ | तेरा | |
| २ | दोन | | | १४ | चौदा | |
| ३ | तीन | | | १५ | पंधरा | |
| ४ | चार | | | १६ | सोळा | |
| ५ | पाच | | | १७ | सतरा | |
| ६ | सहा | | | १८ | अठरा | |
| ७ | सात | | | १९ | एकोणीस | |
| ८ | आठ | | | २० | वीस | |
| ९ | नऊ | | | २१ | एकवीस | |
| १० | दहा | | | २२ | बावीस | |
| ११ | अकरा | | | २३ | तेवीस | |
| १२ | बारा | | | २४ | चोवीस | |
| २५ | पंचवीस | | | ३६ | छत्तीस | |
| २६ | सव्वीस | | | ३७ | सदतीस | |
| २७ | सत्तावीस | | | ३८ | अडतीस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | अठ्ठावीस | | | ३९ | एकोणचाळीस | |
| २९ | एकोणतीस | | | ४० | चाळीस | |
| ३० | तीस | | | ४१ | एक्केचाळीस | |
| ३१ | एकतीस | | | ४२ | बेचाळीस | |
| ३२ | बत्तीस | | | ४३ | त्रेचाळीस | |
| ३३ | तेहेतीस | | | ४४ | चव्वेचाळीस | |
| ३४ | चौतीस | | | ४५ | पंचेचाळीस | |
| ३५ | पस्तीस | | | ४६ | सेहेचाळीस | |
| ४७ | सत्तेचाळीस | | | ६१ | एकसष्ठ | |
| ४८ | अठ्ठेचाळीस | | | ६२ | बासष्ठ | |
| ४९ | एकोणपन्नास | | | ६३ | त्रेसष्ठ | |
| ५० | पन्नास | | | ६४ | चौसष्ठ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | एक्कावन्न | | | ६५ | पासष्ठ | |
| ५२ | बावन्न | | | ६६ | सहासष्ठ | |
| ५३ | त्रेपन्न | | | ६७ | सदुसष्ठ | |
| ५४ | चोपन्न | | | ६८ | अडुसष्ठ | |
| ५५ | पंचावन्न | | | ६९ | एकोणसत्तर | |
| ५६ | छप्पन्न | | | ७० | सत्तर | |
| ५७ | सत्तावन्न | | | ७१ | एक्काहत्तर | |
| ५८ | अठ्ठावन्न | | | ७२ | बहात्तर | |
| ५९ | एकोणसाठ | | | ७३ | त्र्याहत्तर | |
| ६० | साठ | | | ७४ | चौऱ्याहत्तर | |
| ७५ | पंच्याहत्तर | | | ८३ | त्र्याऐंशी | |
| ७६ | शहात्तर | | | ८४ | चौऱ्याऐंशी | |
| ७७ | सत्त्याहत्तर | | | ८५ | पंचाऐंशी | |
| ७८ | अठ्ठ्याहत्तर | | | ८६ | शहाऐंशी | |
| ७९ | एकोणऐंशी | | | ८७ | सत्त्याऐंशी | |
| ८० | ऐंशी | | | ८८ | अठ्ठ्याऐंशी | |
| ८१ | एक्क्याऐंशी | | | ८९ | एकोणनव्वद | |


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८२ | ब्याऐंशी | | | ९० | नव्वद | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९१ | एक्क्याण्णव | | | ९६ | | शहाण्णव | |
| ९२ | ब्याण्णव | | | ९७ | | सत्त्याण्णव | |
| ९३ | त्र्याण्णव | | | ९८ | | अठ्ठ्याण्णव | |
| ९४ | चौऱ्याण्णव | | | ९९ | | नव्व्याण्णव | |
| ९५ | पंच्याण्णव | | | १०० | | शंभर | |

| | | |
|---|---|---|
| १००० = हजार | x २ = दुप्पट, | x३ = तिप्पट |
| १००,००० = एक लाख | x ४ = चौपट , | x ५ = पाचपट |
| १०,०००,००० = एक कोटी | x १० = दहापट, | x ५० = पन्नासपट |
| १,०००,०००,००० = एक अब्ज | x १०० = शंभरपट , | x १००० = हजारपट |

## १ - एक वेगळाच तारा

मानसीला रात्री आकाश पाहायला खूप आवडायचे. आकाशात किती तरी चमचमणारे तारे असायचे. भला मोठा चंद्र सुद्धा असायचा. कधी कधी ती बाबांच्या खांद्यावर बसायची. तिथे तिला अगदी एखाद्या राजकुमारी सारखे वाटायचे. ताऱ्यांच्या खूप जवळ गेल्यासारखे वाटायचे.



एके दिवशी बाबा म्हणाले, "आपण समुद्र किनाऱ्यावर सहलीला जायचय. आवडेल तुला?"

मानसीला काही खात्री नव्हती. "तिथे माझे तारे असतील का?"

"असतील कदाचित." बाबा म्हणाले.

जेव्हा ते किनाऱ्यावर पोहोचले तेव्हा रात्र झाली होती. पण आकाशात ढगांची खूपच दाटी झाली होती. त्यामुळे तारे दिसत नव्हते. बाबा म्हणाला, "उद्या बघूया काय होतंय ते."

"बरं..." निराश होत मानसी म्हणाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते पुन्हा किनाऱ्यावर पोहोचले. मानसी शंख-शिंपले गोळा करू लागली. तेवढ्यात मानसीला एक मजेदार वस्तू सापडली. ती एका मोठ्या, खडबडीत, केशरी रंगाच्या ताऱ्यासारखी दिसत होती. ती आकाशातून पडली होती का? आणि ती चमकत का नव्हती?

तेवढ्यात तिथे बाबा आला. तो हसून म्हणाला, "तो काही तारा नाहीये. तो तर तारामासा आहे. तो समुद्रात राहतो."

मानसीला ते ऐकून खूप गंमत वाटली. तिने तो तारामासा पुन्हा समुद्रात सोडून दिला. परत जाणाऱ्या लाटांबरोबर तो पुन्हा आपल्या घरी गेला.

त्यानंतर मानसीने आणखी तारामासे शोधले आणि पुन्हा समुद्रात सोडून दिले. आता तिला तारे आणि तारामासे सुद्धा आवडायला लागले.



~

मूळ कथा: अनिता अमीन

**स्वाध्याय:**

1. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा:

तारा, गंमत, खात्री, किनारा, सहल, निराश, मजेदार

2. खालील वाक्य वर्तमान काळात बदलून लिहा:

मानसीला रात्री आकाश पाहायला खूप आवडायचे.

___

आकाशात ढगांची खूप दाटी झाली होती.

___

मानसीला ते ऐकून खूप गंमत वाटली.

___

३. मानसीला तारामासा कधी सापडला?

अ) समुद्र किनाऱ्यावर आ) रात्री

इ) तिच्या अंगणात ई) सकाळी

४. तारामासा सापडल्यावर मानसीने काय केले?

अ) तिने शंख-शिंपले गोळा केले. आ) ती किनाऱ्यावर गेली.

इ) ती बाबाच्या खांद्यावर बसली. ई) तिने तारामाश्याला समुद्रात सोडले.

५. तारामासा सापडायच्या आधी मानसीने काय केले?

अ) तिने आकाशात पाहिले. आ) तिने शंख-शिंपले गोळा केले.

इ) तिने आणखी तारामासे शोधले. ई) तिने लाटांबरोबर जाणारा तारामासा पाहिला.

६. किनाऱ्यावर रात्री मानसीला तारे का दिसले नाहीत?

---

---

७. मानसीचे वय किती असेल? का?

---

---

८. या गोष्टीसाठी आणखी एक छान नाव सुचवा.

---

खालील क्रियापदांचा काळ ओळखा आणि योग्य रकान्यात ☑️ अशी खूण करा

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| उदाहरण - आहे | ☑️ | | |
| गायला | | | |
| आठवेल | | | |
| बोललात | | | |
| पाहते | | | |
| ऐकेन | | | |
| धावली | | | |

# २ - कपाटातला प्राणी

धाड! धाड! धाड!

राजूनी डोळे किलकिले करून पाहिले आणि पांघरूण ओढून चेहऱ्यावर घेतले. कपाटातून पुन्हा आवाज आला. आतून दारावर कोणीतरी धडक देत होते.



"कोण आहे तिथे?" राजूने थरथरत्या आवाजात विचारले.

हळूहळू दार उघडायला लागले. राजूने पलंगावर उडी मारली. पळत जाऊन त्याने कपाटाचे दार धाडकन बंद केले. त्याने खुर्ची ओढून दारापुढे आणून ठेवली. राजू पळत खोलीच्या बाहेर गेला. सरळ दादाच्या खोलीत जाऊन राजू त्याच्या पांघरूणात घुसला.

"राजू, तू इथे काय करतोयस?" दादाने डोळे चोळत विचारले.

"माझ्या कपाटात कोणीतरी आहे." राजूने दादाचा हात ओढत सांगितले.

"तुला स्वप्न पडले असेल. जा परत जाऊन झोप." दादा म्हणाला.

"नाही, नाही! मी जागा होतो. कपाटातून आवाज येत होता. आणि दार सुद्धा उघडायला लागले." राजूने आता दादाचे पांघरूण ओढले.

"ठीक आहे, मी येतो. पण जर का कपाटात काही नसेल, तर मग मला नंतर त्रास द्यायचा नाही." दादाने राजूला बजावले.

राजू आणि दादा त्याच्या खोलीत गेले. कपाटातून आवाज येतच होता. दादानी पांघरूण हातात घेतले. तो राजूला म्हणाला, "तू कपाट उघड. मी त्या प्राण्याला पकडतो."

राजूनी खुर्ची बाजूला करून हळूच दार उघडले. कुठलातरी केसाळ प्राणी बाहेर आला. दादानी पटकन त्याला पांघरूणात पकडले.

राजूने खोलीतला दिवा लावला. पाहतात तर काय, दादाच्या हातात होती त्यांची मांजर - मनी!

दादा हसायला लागला. "बिचारी मनी! तुझ्या कपाटात अडकली. तुझ्या वास येणाऱ्या बुटाबरोबर! बाहेर येण्यासाठी धडपड करणारच ना?"

"बिचारी मनी! माझ्यापेक्षा तूच जास्त घाबरली असशील." राजू म्हणाला.

~ (मूळ कथा: केली हशवे)

**स्वाध्याय:**

१. क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणारा शब्द म्हणजे “क्रियाविशेषण.”

खालील क्रियाविशेषणांचा वाक्यात उपयोग करा.

किलकिले-

______________________________

थरथरत -

______________________________

हळूहळू -

______________________________

धाडकन -

______________________________

पटकन -

---

जोरात -

---

लवकर -

---

भसकन -

---

२. या गोष्टीतली मुख्य पात्रे कोणती आहेत? प्रत्येकाची एका वाक्यात माहिती द्या.

---

---

३. ही गोष्ट कुठे घडली आहे?

---

---

४. मुख्य पात्राची अडचण काय आहे?

---

५. ती अडचण कशी सोडवली?

६. नामाबद्दल (noun) विशेष माहिती देणारा शब्द म्हणजे विशेषण (adjective): खालील विशेषणांचा वापर करून वाक्ये तयार करा.

गडद

गोड

रिकामा

लहान

कोरडा

## ३ - बुच ओ’हेअर

मित्रांनो, युद्धाच्या कथा रोमांचक असतात. ही अशीच एक युद्धाची कथा आहे. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेच्या वायुदलात बुच ओ’हेअर नावाचा वैमानिक होता. लेक्सिंग्टन नावाच्या नौकेवर तो वाइल्ड कॅट नावाचे विमान उडवत असे.




२० फेब्रुवारी १९४२ हा तो दिवस होता. लेक्सिंग्टन नौकेला जपानच्या एका बंदरावर हल्ला करायचा आदेश मिळाला होता. लेक्सिंग्टन समुद्रातून जात असताना जपानच्या विमानाने तिला पाहिले आणि जपानी ठाण्याला कळवले. आता लेक्सिंग्टनवर हल्ला करण्यासाठी जपानी विमान हवेत झेपावले.

इकडे जपानी ठाण्यावर हल्ला करण्यासाठी अमेरिकेची वाइल्ड कॅट हवेत झेपावली. त्यातच बुचचे विमान सुद्धा होते. अचानक बुचला आपल्या नौकेकडे जाणारी जपानी विमाने दिसली. त्याच्या लक्षात आले की जर जपानी विमाने लेक्सिंग्टन पर्यंत पोहोचली, तर लेक्सिंग्टनला धोका आहे. बुचच्या बरोबरीची इतर विमाने पुढे गेली होती. तो एकटाच होता. पण विचार करायलाही वेळ नव्हता.

बुचने एकदम निर्णय घेतला. त्याने एकट्याने त्या आठ विमानांवर हल्ला केला. आठही विमानांकडून होणारा गोळ्यांचा मारा चुकवत त्याने प्रतिकार करायला सुरुवात केली. नेम धरून त्याने एका विमानाच्या पंखावर गोळ्या झाडल्या. त्या गोळ्यांनी विमानाचे इंजिन तुटून खाली पडले. मागोमाग ते विमान समुद्रात कोसळले. असे करत बुचने चार विमाने पाडली. आता मात्र त्याच्याकडच्या गोळ्याही

संपत आल्या होत्या. तरीही धीर न सोडता बुचने पाचव्या विमानावर हल्ला चढवला. तेवढ्यात इतर वाइल्ड कॅट तिथे आली आणि त्यांनी उरलेल्या जपानी विमानांवर हल्ला चढवला. शत्रूच्या विमानांना पाडून वाइल्ड कॅट लेक्सिंग्टन वर सुखरूप परत उतरली.

बुचच्या सहकाऱ्यांना त्याच्या शौर्याचे अतिशय कौतुक वाटले. त्याच्यामुळेच आज लेक्सिंग्टन आणि तिच्यावरचे सगळे वाचले होते.

बुचच्या या असामान्य कामगिरीचे कौतुक करण्यासाठी त्याला काँग्रेसचे सन्मान पदक देण्यात आले. हा देशातला सर्वात मोठा सन्मान आहे.

शिकागोच्या विमानतळाचे नाव “ओ’हेअर” आहे हे तर सर्वांना माहितीच आहे. पण ते बुच ओ’हेअरची आठवण म्हणून ठेवले आहे हे किती जणांना माहिती आहे?

~~~

**स्वाध्याय:**

१. एखाद्या होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल बोलणे म्हणजे “भूतकाळ.” क्रियापदाचा भूतकाळात वापर करताना सहसा शेवटी “ला,” “ली” अथवा “ले” येतात. उदाहरणार्थ गेला, झाली, पडले इ. धड्यातील भूतकाळाच्या क्रियापदा खाली रेघ मारा. कोणत्याही सहा क्रियापदांचा भूतकाळात वापर करून वाक्ये करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________
~~~

२. खालील वाक्यातील विशेषण शोधा. ते वापरून आणखी एक वाक्य तयार करा.

मित्रांनो, युद्धाच्या कथा रोमांचक असतात.

---

बुच ओ'हेअर धाडसी वैमानिक होता.

---

बुचने असामान्य कामगिरी केली.

---

काँग्रेसचे पदक हा मोठा सन्मान आहे.

---

३. खालील शब्द क्रमाने ओळीत लिहा.

तिसरा, शेवटचा, पाचवा, नववा, पहिला, सातवा, दुसरा, आठवा, दहावा, चौथा, सहावा

---

४. गाळलेल्या जागा भरा:

१. या वर्षी माझा ______________________________ वाढदिवस आहे.

२. अजितने शर्यत जिंकली. म्हणजेच तो शर्यतीत _________________ आला.

३. पृथ्वी हा सूर्यापासून ___________________ ग्रह आहे.

४. शनिवार हा आठवड्यातील _____________________ दिवस आहे.

# ४ - आमचा पाळीव प्राणी

(मुलांचा रंगमंच)

(या नाटुकलीत आहेत तीन मुले. आई बाबांनी त्यांना एक पाळीव प्राणी निवडायला सांगितले आहे. मुलांच्या निवडीने आई बाबांना जरा आश्चर्यच वाटते...)

पात्रपरिचय:

निवेदक, बाबा, आई, राजू, मिनी, नीतू



*निवेदक:* *मुलांना कधीपासून एक पाळीव प्राणी हवा आहे. कधीही विचारले तरी आई बाबांचे आपले एकच उत्तर...*

राजू: आपण एक मनी माऊ आणायची का?

आई: नाही. तुझ्या बहिणीला मनीच्या केसांचा त्रास होतो.

मिनी: मग आपण मासे आणायचे का?

बाबा: नाही. माशांचं भांडं साफ कोण करणार?

नीतू: आपल्या अंगणात मी एक साप पाहिला आहे. त्याला पाळायचे का?

आई: मुळीच नाही!

*निवेदक:* *एक दिवस आई आणि बाबा चांगल्या मूड मध्ये होते. त्यांनी तीनही मुलांना बोलावून बसायला सांगितले.*

आई: बाबा आणि मी बोललो. आम्हाला वाटतं की तुम्ही आता मोठे झाला आहात. जबाबदार झाला आहात. तुम्हाला आता...

© BMM Copyright 2023. All rights reserved.

बाबा: ...एक पाळीव प्राणी आणता येईल. तुम्हाला पाहिजे तो प्राणी निवडा. पण त्याची जबाबदारी मात्र तुम्ही घेतली पाहिजे.

आई: तर मग आता तुम्ही सगळे मिळून ठरवा तुम्हाला काय पाहिजे ते.

*निवेदक: मुले मोठ्या आनंदाने आपल्या खोलीत निघून जातात. साधारण दहा मिनिटांनी मुले पुन्हा बाहेर येतात.*

राजू: आम्ही सगळ्यांनी विचार केला...

मिनी: आम्हाला पाहिजे आहे...

नीतू: एक अस्वल!

आई: अस्वल? म्हणजे... टेडी बेअर?

राजू: नाही, नाही! एक खरं खुरं अस्वल! बघा ना, अस्वल कोणाकडेच नसते. म्हणजे आमचा प्राणी अगदी वेगळा असेल नाही?

मिनी: त्यांना खायला देणं सुद्धा सोपं आहे. जांभळे आणि मध दिला की बस्स!

नीतू: आणि ते थंडीत झोपतात. म्हणजे आपल्याला सहलीला जायला सोपं!

राजू: शिवाय, आपल्या घरी जर अस्वल असेल, तर चोरांची भीतीच नाही!

मिनी: मग, तुम्हाला काय वाटतंय?

नीतू: घ्यायचं आपण अस्वल?

*निवेदक: आई बाबांनी एकमेकांकडे पाहिले. मुलांच्या निवडीचे त्यांना चांगलेच आश्चर्य वाटले होते. पण आई बाबांच्या उत्तराने मुलांना आणखीच आश्चर्य वाटले.*

आई: हो, आणूयात आपण अस्वल.

बाबा: आईला आणि मला वाटतंय की ही छानच कल्पना आहे.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

आई: आपण जर अस्वल घेतलं, तर तुम्ही मुलं त्याला खायला प्यायला देणार, नाही का? किती बरं खाईल अस्वल?

बाबा: हां... मला वाटतंय की दररोज २० पौंड जांभळे आणि ५-६ तरी मासे खाईल, नाही?

आई: आणि इतकं सामान काही मला दुकानातून आणता येणार नाही. मुलांना दररोज चालत दुकानात जाऊन आणायला लागेल.

बाबा: थंडीत, बर्फात, एक मैल चालायला लागेल त्यांना.

राजू: एक मैल चालायला लागेल?

मिनी: दररोज जायला लागेल?

नीतू: थंडीत सुद्धा जायला लागेल?

आई: शिवाय, इतक्या सामानाचा खर्चही बराच होईल, नाही?

बाबा: हो ना. आठवड्याला ५०० रुपये तरी लागतीलच. मुलांना त्यांच्या पैशातूनच आणायला लागेल.

राजू: आमचे पैसे?

मिनी: आठवड्याला ५०० रुपये?

नीतू: पण आम्हाला तर तुम्ही फक्त १० रुपये देता.

आई: खरंच की, आम्ही याचा तर विचारच नाही केला.

बाबा: ठीक आहे. तुम्ही आणखी काही कामे करून जास्त पैसे मिळवू शकता.

राजू: पण बाबा...

आई: हो ना, कपडे धुणं, स्वयंपाक करणं...

मिनी: पण आई...

बाबा: अंगण साफ करणं, बागेतली कामं करणं...

मुलं: थांबा, थांबा...

*निवेदक: मुलांना आता काही सहन होत नव्हतं...*

राजू: आम्हाला अस्वल नकोच.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

मिनी: आमचा दुसरा प्राणीच छान आहे.

नीतू: हो... आम्हाला आता पाहिजे...

आई: काय पाहिजे? हत्ती का घोडा?

बाबा: वाघ का सिंह?

मुलं: नाही!

राजू: आम्हाला पाहिजे एक कुत्र्याचं पिल्लू.

मिनी: एक गोड पिल्लू.

नीतू: जे आमच्या बरोबर पळापळी खेळेल.

आई: ही निवड बाकी छान आहे!

बाबा: पण तुमच्या पिल्लाचं नाव काय ठेवणार?

सगळी मुलं: भालू!

~ (मूळ कथा: एला केनन)

**स्वाध्याय:**

१. मुलांना अस्वल का हवे होते? तीन कारणे सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

२. मुलांना अस्वल नकोसे का वाटले? तीन कारणे सांगा.

________________________________________

________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

३. तुमच्या आवडत्या प्राण्यावर परिच्छेद (paragraph) लिहा

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# ५ – राणीची बाग

स्वप्नात पाहिली राणीची बाग

हत्तीच्या पाठीवर बसलाय नाग

हरणा बरोबर खेळत पत्ते

बसले होते दोन चित्ते

उंट होता वाचत कुराण

माकड होते सांगित पुराण

सिंह होता व्याख्यान देत

गाढव होते उतरून घेत

जिराफ होता गात छान

माने इतकीच लांब तान

कोल्हा होता दुकानदार

त्याच्या दुधात पाणी फार

मला पाहता म्हणती सारे

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

एक पिंजरा याला द्यारे

त्याबरोबर आली जाग

स्वप्नात पाहिली राणीची बाग..

~ मूळ कवी: विंदा करंदीकर

**स्वाध्याय:**

१. खालील शब्दांचा उपयोग करून वाक्ये तयार करा:

पिंजरा ______________________________

______________________________

स्वप्न ______________________________

______________________________

दुकानदार

______________________________

______________________________

व्याख्यान

______________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

______________________________________________

बाग ____________________________________________

______________________________________________

दूध ____________________________________________

______________________________________________

२. कवितेत कुठले प्राणी आहेत?

______________________________________________

______________________________________________

३. कुठल्या प्राण्यासाठी पिंजरा आणायला सांगितला आहे?

______________________________________________

______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

४. सर्वनाम (pronoun) म्हणजे वाक्यात नामाच्या ऐवजी येणारा शब्द. खालील सर्वनामांचा वापर करून वाक्ये तयार करा.
उदाहरण - मला शाळा आवडते.

त्या ______________________________________________

______________________________________________

माझे ______________________________________________

______________________________________________

आमच्या

______________________________________________

______________________________________________

काय ______________________________________________

______________________________________________

कोण ______________________________________________

______________________________________________

जे______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

ती ________________________________________________

________________________________________________

आपण________________________________________________

________________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

## ६ – पत्र

२०

मार्च, २०२३

प्रिय आत्या, पाचवी

सा. न. वि. वि.

अगं, अगं,अगं, चार फूट वर उडाली असशील ना अशी फॉर्मल सुरुवात वाचून? पण इतकी आश्चर्यचकीत होऊ नकोस. आईने सांगितलं “सा. न. वि. वि.” असं लिहायला, आणि त्याचा अर्थही समजावून सांगितला. म्हणून तसं लिहीलं. असो.

तुला मुद्दाम ई-मेलने पत्र लिहायचं असं ठरवलंच होतं मी आज. मी बास्केटबॉल खेळायला जाते हे तर तुला माहितीच आहे ना? काल-आजमध्ये आमच्या स्पर्धा होत्या. अगं, आमची टीम अंतिम फेरीत पोहोचली, आणि आम्ही अंतिम फेरी जिंकलोसुध्दा. कित्ती कित्ती आनंद झाला म्हणून सांगू तुला!

जेव्हा आम्ही जिंकलो तेव्हा सर्वात पहिल्यांदा मला तुझी आठवण झाली. तू गेल्या वर्षी इकडे रहायला आली होतीस तेव्हा तू माझा खेळ पाहिला होतास. तू पण शाळा कॉलेजमध्ये असताना बास्केटबॉल चॅम्पियन होतीस ना? तुझ्याबरोबर मारलेल्या सगळ्या सगळ्या गप्पा मला आठवत होत्या. बाकी आमचा खेळ कसा रंगला आणि काय काय गमतीजमती झाल्या ते तुला सगळं सांगायचंय. पण त्याविषयी सविस्तर गप्पा मारायला मी तुला फोनच करेन.

मला आता मराठीतून टाईप करता येतं. म्हणूनच तुला दोन दोन आश्चर्याचे धक्के एकदम द्यावे असं ठरवलं. “एका दगडात दोन पक्षी” म्हणतात ना तसं.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

बाकी काय लिहू? चिनूदादा, चैत्रुताई दोघे कसे आहेत? त्यांना नक्की वाचून दाखव हां माझे हे <u>पहिले-वहिले</u> मराठी पत्र. काकांना नमस्कार कळव. तुम्ही पुन्हा इकडे <u>ट्रीप</u> काढा. आपण <u>खूप</u> <u>खूप</u> मज्जा करू!

चला. अच्छा.

कळावे,

तुझी लाडकी भाची,

प्राची.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

**स्वाध्याय:**

१. कितीतरी इंग्रजी शब्द मराठीत लिहिता-बोलताना जसेच्या तसे वापरले जातात. असे काही शब्द वरील पत्रात आहेत. ते शोधा पाहू.
असे अजून कोणते शब्द तुम्हाला पटकन आठवतात का? असे काही शब्द खाली लिहून काढा.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |

२. काही वेळा एकच शब्द सलग दोन वेळा वापरतात. उदा.
काय काय केलंत?
कुठे कुठे गेला होतात?
अशा प्रकारची वाक्ये वरील पत्रात आहेत का? कोणती कोणती वाक्यं मिळाली सांगा बरं! अशा प्रकारची ४ वाक्ये तुम्ही स्वतः तयार करा व पुढे लिहा.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

३.तुमच्या एका भावंडाला पत्र लिहा. पत्रात एका सुटीच्या दिवशी तुम्हाला त्याची/तिची खूप आठवण का झाली हे नमूद करा. तुम्ही बहीण-भावाला पत्र लिहिताना “सा. न. वि. वि.” असे लिहाल का? - विचार करा!

© BMM Copyright 2023. All rights reserved.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

७ - मी करणार आहे

मीना: नमस्कार अमोल. काय म्हणतोस?

अमोल: नमस्कार मीना. मी छान आहे. तू काय म्हणतेस?

मीना: मी मजेत आहे. तू आज दुपारी काय करणार आहेस?

अमोल: मी आज दुपारी थोडा अभ्यास करणार आहे. त्यानंतर पियानो वाजवणार आहे. तू काय करणार आहेस?

मीना: पुढच्या आठवड्यात माझी परीक्षा आहे, त्यामुळे मी पण अभ्यास करणार आहे. नंतर संध्याकाळी आम्ही सिनेमा पाहणार आहोत. तू येशील का?

अमोल: मला खूपच आवडेल. पण आईला विचारायला पाहिजे. मी तिला विचारीन.

मीना: परीक्षा संपल्यावर आम्ही सहलीला जाणार आहोत.

अमोल: अरे वा! तुम्ही सहलीला कोठे जाणार आहात?

मीना: आम्ही सहलीला कोकणात जाणार आहोत. कोकणात आम्ही खूप मजा करणार. समुद्रात पोहायला जाणार.

अमोल: तिथे आंबे आणि फणस खाणार का?

मीना: हो तर, आणि खूप मासे पण खाणार.

अमोल: कोकणात कोणाकडे जाणार आहात?

मीना: कोकणात माझे मामा-मामी राहतात. आम्ही त्यांच्याकडे जाणार आहोत.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

अमोल : <u>कोकणात</u> खूप <u>गरम</u> असते ना?

मीना: हो. पण दुपारी नारळाच्या झाडांखाली छान थंड वाटते.

**स्वाध्याय:**

१. दिवसाचे भाग असतात - पहाट, सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्र. या प्रत्येक वेळेला तुम्ही काय करता ते लिहा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

२. विरुद्ध अर्थाचे शब्द धड्यातून शोधा.

थोडा - ____________________

गरम- ____________________

३. खालील वाक्ये भविष्यकाळात लिहा.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

मी रोज व्यायाम करतो.

------------------------------------------------------------

मी दुपारी टेनिस खेळते.

------------------------------------------------------------

अमोल खूप अभ्यास करतो.

------------------------------------------------------------

मी आईला प्रश्न विचारते.

------------------------------------------------------------

आम्ही सहलीला जातो.

------------------------------------------------------------

तू आंबा खातोस का?

------------------------------------------------------------

तुम्ही समुद्रात पोहता का?

------------------------------------------------------------

४. “त्यामुळे,” “म्हणून” या शब्दांनी दोन वाक्ये जोडता येतात. प्रत्येकी दोन वाक्ये तयार करा.

__________________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

५. महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेला समुद्राचा किनारा आहे. या किनाऱ्याला कोकण असे नाव आहे. कोकणाबद्दल माहिती शोधून चार वाक्ये लिहा. नकाशात कोकण रंगवा.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 


MAHARASHTRA
REGION/MANDAL MAP
N
Gulf of Khambhat
NANDURBAR
DHULE
JALGAON
KHANDESH AND NORTHERN MAHARASHTRA REGION
NASHIK
AURANGABAD
THANE
AHMADNAGAR
JALNA
AMRAVATI
AKOLA
VIDARBHA REGION
BULDHANA
WASHIM
YAVATMAL
NAGPUR
BHANDARA
GONDIA
WARDHA
NAGPUR DIVISION
CHANDRAPUR
GADCHIROLI
HINGOLI
MARATHWADA REGION
PARBHANI
BID
NANDED
KONKAN
PUNE
OSMANABAD
LATUR
RAIGARH
DESH OR PASCHIM MAHARASHTRA REGION
SOLAPUR
SATARA
RATNAGIRI
ARABIAN SEA
SANGLI
KOLHAPUR
SINDHUDURG
www.mapsofindia.com
Map not to Scale
Copyright © 2012 www.mapsofindia.com
(Updated on 5th November 2012)
LEGEND
International Boundary
State Boundary
District Boundary
Region/Mandal Boundary
State Capital

## ८ - मकर संक्रांत

आपण पृथ्वीवरून जेव्हा उगवत्या सूर्याकडे पाहतो, तेव्हा एक गोष्ट आपल्या लक्षात येते. ती म्हणजे, सूर्याच्या उगवण्याची जागा वर्षभर सारखी नसते. एका ठराविक दिवशी सूर्याचे 'उत्तरायण' सुरू होते. म्हणजे त्या दिवसापासून सूर्याच्या उगवण्याची जागा उत्तरेकडे सरकू लागते. हा दिवस म्हणजेच मकरसंक्रांत!

मकर संक्रांत हा भारतीयांच्या राष्ट्रीय सणांपैकी एक सण आहे. हा एकमेव भारतीय सण आहे जो इंग्रजी कॅलेंडरच्या तारखेप्रमाणे साजरा करतात. तो दरवर्षी १४ किंवा १५ जानेवारीला असतो. हा सण भारतात वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. उदा. गुजरात, राजस्थानमध्ये 'उत्तरायण', पंजाबमध्ये 'लोहरी', तर तामिळनाडूमध्ये 'पोंगल' अशा नावांनी तो ओळखला जातो.

महाराष्ट्रात ह्या सणाला घरी हलवा, तिळगूळ, गुळाची पोळी असे पदार्थ करतात. हळदी-कुंकू लावून, फुले वाहून सुगडाची पूजा करतात. ह्या सणाच्या निमित्ताने स्त्रिया इतर स्त्रियांना, मुलींना घरी बोलावून हळदी-कुंकू करतात, वाण लुटतात. नवीन लग्न झालेल्या स्त्रिया हलव्याचे दागिने घालून हळदी-कुंकवाचं वाण लुटतात. ह्या सणाला लहान मुलांचे बोरन्हाण करतात. लहान मुलांना हलवा वापरून तयार केलेले दागिने घालतात. लहान, मोठे सर्व लोक एकत्र येऊन पतंग उडवायचा आनंद लुटतात.





हा सण साजरा करण्याच्या विविध पद्धती आपण वर पाहिल्या. ह्या सर्वात एक गोष्ट सारखी आहे. ती म्हणजे एकी व एकीमधून मनोरंजन. मग तिळगूळ, गुळाची

© BMM Copyright 2023. All rights reserved.

पोळी, किंवा हलवा असू दे, पतंग उडवायला एकत्र जमणे असू दे, हळदी कुंकू म्हणून एकत्र येणे असू दे वा इतर काही असू दे. सर्वांनी एकत्र यायचे व आनंदाने राहायचे हा महत्त्वाचा संदेश मकरसंक्रांतीचा सण आपल्याला देतो. म्हणूनच एकमेकांना तिळगूळ देताना आपण म्हणतो -

“तिळगूळ घ्या
गोड गोड बोला,
आमचा तिळगूळ सांडू नका,
आमच्याशी कधी भांडू नका!”

**स्वाध्याय:**

१. हा सण कोणत्या मराठी महिन्यात येतो?

___________________________________________

__________________________________________.

२. ह्या सणाच्या वेळी भारतात हवामान कसे असते?

___________________________________________

__________________________________________.

३. ह्या सणाला कोणता/कोणते पदार्थ करतात?

___________________________________________

__________________________________________.

४. तो पदार्थ त्या सणाला करण्यामागे काही कारण असल्यास ते कारण सांगा?

___________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

________________________________________________.

५. हा सण कसा साजरा करतात ?.

________________________________________________

________________________________________________.

६. खाली मराठी सण, सणाच्या दिवशी केले जाणारे खाद्यपदार्थ, व सण साजरा करायची एखादी पद्धती याविषयीचे कोष्टक दिले आहे. ते वाचून योग्य जोड्या जुळवा.

| सण | पदार्थ | साजरा करण्याची पद्धत |
|---|---|---|
| रक्षाबंधन/ नारळी पौर्णिमा | फराळ | हंडी फोडतात. |
| दहीहंडी/ गोकुळाष्टमी | पुरणपोळी | पणत्या, कंदील लावतात, अभ्यंगस्नान करतात. |
| दिवाळी | नारळीभात | लाकडे गोळा करून त्याची होळी पेटवतात. |
| होळी | दहीकाला | बहीण भावाला राखी बांधते. |

© BMM Copyright 2023. All rights reserved.

७. मुलांनी कोणताही एक भारतीय सण निवडायचा. त्या सणावर आधारीत माहिती गोळा करायची. काही मुद्दे खाली दिले आहेत. मुले ह्या मुद्द्यांचा वापर करू शकतात.

- ❖ हा सण कोणत्या मराठी महिन्यात येतो.
- ❖ ह्या सणाच्या वेळी भारतात हवामान कसे असते.
- ❖ ह्या सणाला कोणता/कोणते पदार्थ करतात.
- ❖ तो पदार्थ त्या सणाला करण्यामागे काही कारण असल्यास ते कारण सांगा.
- ❖ एखादा पदार्थ तयार करायची कृती सांगणे.
- ❖ सण साजरा करायची एखादी पद्धती सविस्तर सांगणे.

**माहितीसाठी:**

- राष्ट्र - राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, परराष्ट्र
- शास्त्र - शास्त्रीय
- वंदन - वंदनीय
- उगवणे - उगवत्या
- पडते - पडत्या
- उडते - उडत्या
- चढते - चढत्या
- घटणे - घटत्या
- मावळणे - मावळत्या

**वरची उदाहरणे वापरून १० नवीन शब्द शोधून वाक्ये लिहा.**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# ९ – सौर उर्जा – सूर्याची शक्ती



वनस्पती सूर्यापासून उर्जा मिळवतात. पण सूर्य ही उर्जा कशी तयार करतो?

सूर्याची उर्जा आपल्यापर्यंत प्रकाश आणि उष्णतेच्या रूपाने पोहोचते. माणसाने हजारो वर्षे सूर्याच्या उष्णतेचा वापर केला आहे. आपण सूर्याच्या उष्णतेने कपडे वाळवू शकतो, पाणी गरम करू शकतो, अन्न शिजवू शकतो. तुम्ही कधी भिंग सूर्यप्रकाशात धरले आहे का? भिंग सूर्यप्रकाश एकत्र करून खूप उष्णता तयार करू शकते. त्यामुळे आग सुद्धा लागू शकते.

Solar panel वापरून आपण वीज सुद्धा तयार करू शकतो. या विजेचा वापर करून आपण calculator पासून अगदी गाडी सुद्धा चालवू शकतो. पण मग आकाशात ढग आले तर काय करायचे? त्यासाठी सोलर पॅनल मधून तयार झालेली वीज आपण साठवू शकतो. अशी साठवलेली वीज रात्री किंवा पावसाळ्यात वापरता येते.

अशा सौर ऊर्जेपासून वीज करायला माणसाने नुकतीच सुरुवात केली आहे. पण त्याच्या वापराला काहीच मर्यादा नाहीये. माणसाने आत्तापर्यंत पृथ्वीवर जेवढी उर्जा वापरली आहे, त्याच्यापेक्षा जास्त उर्जा तर सूर्य एका सेकंदात तयार करतो. विचार करा, जर का आपण ही सगळी उर्जा वापरू शकलो, तर काय होईल बरे?

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

**स्वाध्याय:**

१. या धड्यात खूप नवीन शब्द आहेत. खालील शब्दांचा उपयोग करून वाक्ये तयार करा.

उर्जा -

---

वनस्पती -

---

उष्णता -

---

सूर्यप्रकाश -

---

भिंग -

---

वीज -

---

मर्यादा -

---

२. सूर्याची उर्जा आपण आणखी कशा प्रकारे वापरू शकतो? दोन उदाहरणे लिहा.

---

---

© BMM Copyright 2023. All rights reserved.

३. सूर्याची उर्जा आपण आणखी जास्त वापरायला लागलो तर काय होऊ शकेल बरे?

४. शास्त्रीय विषयावर परिच्छेद (Paragraph) लिहा.

- सेल फोनचा वापर धोकादायक आहे का नाही?
- वाहनांमुळे प्रदूषण होते. वाहनांचा वापर कमी करावा का नाही?
- शाकाहार चांगला आहे का नाही?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# १० - अनूचे स्वप्न

अनूला तिची कारखान्यातली नोकरी अजिबात आवडत नव्हती. त्यामुळे कामाचा विचार मनातून काढून टाकत ती चालली होती. तेवढ्यात तिला बाजूच्या दुकानात रचून ठेवलेल्या कुंड्या दिसल्या.

अनूचे दररोजच दुकानाकडे लक्ष जाई. कुंड्या तशाच होत्या. एक दिवस धीर करून ती दुकानात गेली. तिने विचारले, "या कुंड्या नाहीतरी पडूनच आहेत, तर मला थोड्या देता का?"

दुकानातून थोड्या कुंड्या घेऊन ती घरी आली. तिने कुंड्या मागच्या गच्चीत रचून ठेवल्या. तिच्या मनातले विचार चालूच होते.

असेच काही दिवस गेले. अनूला एका दुकानात माती आणि बिया दिसल्या. माती स्वस्तही होती. माती घेऊन चालतच ती घरी गेली. दुसऱ्या दिवशी सकाळीच अनू गच्चीत गेली. तिने सगळ्या कुंड्यांमध्ये माती घातली. सगळ्यात मोठ्या कुंड्यांमध्ये टोमॅटो, त्यापेक्षा लहान कुंड्यांमध्ये काकड्या आणि सगळ्यात लहान कुंड्यांमध्ये फुले लावली.

रात्री झोपल्यानंतर तिच्या डोळ्यांपुढे फुलांचे ताटवे येऊ लागले. जागेपणी देखील तिच्या मनात आपल्याच बागेतल्या भाज्यांचे विचार येऊ लागले. रसाळ टोमॅटो खायला किती मजा येईल? काकडीची कोशिंबीर किती छान होईल? बागेतली नाजूक फुले कारखान्यातल्या मैत्रिणींना देता येतील. त्या तर विचारतील की कुठल्या फुलांच्या दुकानावर धाड टाकली?

एक दिवस खूपच गरम झाले. अनूला तिच्या रोपांची काळजी वाटू लागली. ती भरभर चालतच घरी पोहोचली. गच्चीत जाऊन पाहते तो काय, तिच्या रोपांनी

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

माना टाकल्या होत्या. ती अगदी सुकून गेली होती. अनूनी त्यांना पाणी घालायला सुरुवात केली. आता समोरच्या घराची सावली तिच्या रोपांवर पडली होती. थोड्याच वेळात रोपे पुन्हा तरारली. तेव्हा कुठे अनूच्या जीवात जीव आला.

अंधार पडेपर्यंत अनू तिच्या बागेत बसून राहिली. नंतर सुद्धा तिच्या डोक्यात विचार होते आपल्या दुकानाचे, आणि तिथे विकायला ठेवलेल्या आपल्या बागेतल्या भाज्यांचे.



**स्वाध्याय:**

१. खालील वाक्प्रचारांचा उपयोग करून वाक्ये तयार करा.

धीर करणे

_______________________________________________

पडून असणे

© BMM Copyright 2023. All rights reserved.

मजा येणे

धाड टाकणे

जीवात जीव येणे

मान टाकणे

काळजी वाटणे

२. विरुद्ध अर्थाचे वाक्प्रयोग धड्यातून शोधून लिहा:

३. रचून काय काय ठेवतात? दोन उदाहरणे लिहा.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

४. एक दिवस धीर करून... (तुम्ही काय केले ते लिहा.)

५. अनू श्रीमंत होती का गरीब? तुम्हाला तसे का वाटते?

६. एका दिवशी अनूला तिच्या रोपांची काळजी का वाटली?

७. अनू कुठे नोकरी करते? तिला तिची नोकरी आवडते का? तिचे स्वप्न काय आहे?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

८. विरुद्धार्थी शब्द लिहा.

(पाठवणे, नावडणे, देणे, प्रखर, मंद, उन्हाळा, खुरटणे, शाकाहारी, अपुरे, सामान्य, काळेकुट्ट, सोपे, अपचन, हळू, भक्ष्य, समानार्थी)

| | |
|---|---|
| आवडणे x | पटकन x |
| सौम्य x | पचन x |
| हिवाळा x | कठीण x |
| मांसाहारी x | भरपूर x |
| विशेष x | फोफावणे x |
| पांढरेशुभ्र x | लख्ख x |
| भक्षक x | मिळणे x |
| आणणे x | विरुद्धार्थी x |

९. उभयान्वयी अव्यये- दोन किंवा अधिक शब्द, अथवा दोन किंवा अधिक वाक्ये यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यये म्हणतात.
उदा-आणि, शिवाय, कारण, की, परंतु, अथवा, किंवा, म्हणून, म्हणजे, जर-तर, जरी-तरी इत्यादी.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## ११ - आजारीपण

पडू आजारी | मौज हीच वाटे भारी |
नकोच जाणे मग शाळेला,
काम कुणी सांगेल न मजला,
मऊ मऊ गादी निजावयाला,
चैनच सारी | मौज हीच वाटे भारी ||१||



मिळेल सांजा, साबुदाणा,
खडीसाखर, मनुका, बेदाणा,
संत्री, साखर-लिंबू आणा,
जा बाजारी | मौज हीच वाटे भारी ||२||

भवती भावंडांचा मेळा,
दंगा थोडा जरी कुणी केला,
मी कावुन सांगेन तयाला,
जा बाहेरी | मौज हीच वाटे भारी ||३||

कामे करतिल सारे माझी,
झटतिल ठेवाया मज राजी,
बसेल गोष्टी सांगत आजी,
मज शेजारी | मौज हीच वाटे भारी ||४||

असले आजारीपण गोड,
असुनी कण्हती का जन मूढ?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

हे मजला <u>उकलेना</u> <u>गूढ</u>,
म्हणून विचारी | मौज हीच वाटे भारी ||५||

**स्वाध्याय:**

१. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा:

मौज

______________________________

चैन

______________________________

निजणे

______________________________

झटणे

______________________________

कावणे

______________________________

कण्हणे

______________________________

गूढ

______________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

२. आजा<u>री</u> आणि भा<u>री</u> या दोन शब्दात शेवटी “री” हा उच्चार (syllable) आला आहे. पुढील कडव्यातील असे जुळणारे शब्द (rhyming words) शोधा.

शाळे<u>ला</u> ------------------------------------------------

साबुदा<u>णा</u> ------------------------------------------------

मे<u>ळा</u> ------------------------------------------------

मा<u>झी</u> ------------------------------------------------

३. कवितेतल्या मुलाला आजारीपण का आवडते? कोणत्याही दोन गोष्टी लिहा?

_______________________________________________

_______________________________________________

४. आजारीपण तुम्हाला का आवडते किंवा का नाही आवडत ते लिहा?

_______________________________________________


_______________________________________________

_______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## १२ – फ्लो जो

फ्लोरेंस ग्रिफिथ जॉयनर १९८८ सालच्या ऑलिंपिकनंतर खूपच प्रसिद्ध झाली. अमेरिकेच्या महिलांना धावण्याच्या शर्यतीत मिळालेल्या ६ सुवर्ण पदकांपैकी ३ एकट्या फ्लोरेंसने मिळवली. तिने १०० आणि २०० मीटरच्या शर्यतींमध्ये जागतिक विक्रम सुद्धा केले. तिचे हे विक्रम अजूनही कोणी मोडलेले नाहीत. म्हणजे आज सुद्धा फ्लोरेंस हीच जगातील सर्वात वेगवान धावपटू आहे.




फ्लोरेंसच्या नावातील पहिली अक्षरे घेऊन तिचे टोपण नाव तयार झाले - “फ्लो-जो.” फ्लो-जोचे कुटुंब लॉस एंजेलिस इथले. तिच्या कुटुंबात अकरा भावंडे होती. तिचे आई वडील वेगळे झाले होते. फ्लो-जो तिच्या आई बरोबर राहायची. ती तिच्या वडिलांना भेटायला मोहावी वाळवंटात जात असे. तिथेच सशांच्या मागे पळताना ती वेगात धावायला लागली.

फ्लो-जोची आई खूपच कडक होती. तिचे अनेक नियम होते. रविवार सोडून इतर दिवशी टीव्ही बघायला परवानगी नसे. फ्लो-जो मोठी झाल्यावर सुद्धा आईचे नियम पाळत असे. ती रोज बायबल वाचत असे. जेवायच्या आधी प्रार्थना म्हणत असे.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

फ्लो-जोने कमी अंतराच्या शर्यतींमध्ये पदके जिंकली. पण ती रोज तेरा मैल पळत असे. ती ३२० पौंड वजन पेलून बैठका मारत असे. फ्लो-जो अतिशय कष्टाळू होती. तिचा ठाम विश्वास होता - जोपर्यंत तुम्ही प्रयत्न थांबवत नाही, तोपर्यंत तुम्ही हारत नाही.

फ्लो-जो अनेक प्रकारच्या केशरचना करत असे. तिची नखे सहा इंच लांब होती आणि त्यांना ती अनेक चमकदार रंगांनी रंगवत असे. तिला चित्रे काढायला आवडत. तसेच ती कविता करत असे आणि मुलांसाठी पुस्तके सुद्धा लिहित असे.

**स्वाध्याय:**

१. वाक्यात उपयोग करा:

प्रसिद्ध

______________________________

शर्यत

______________________________

वेगवान

______________________________

धावपटू

______________________________

स्पर्धा

______________________________

कष्टाळू

______________________________

ठाम

______________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

केशरचना

२. फ्लो-जो हे टोपण नाव कसे तयार झाले?

३. हा धडा लिहिण्यामागे लेखकाचा उद्देश काय आहे?
क) माहिती देणे. ख) मनोरंजन करणे ग) मन वळवणे

४. फ्लो-जो च्या यशाचे कारण काय आहे?

५. नामांचा पुन्हा पुन्हा वापर टाळण्यासाठी सर्वनामांचा वापर करतात. मी, तो, ती, मला, त्याला, तिला, तिची इ. सर्वनामांची काही उदाहरणे आहेत. वरील धड्यातील सर्वनामे शोधा व त्यांच्याखाली रेघ मारा.

६. तुमच्या आवडत्या खेळाडू बद्दल एक छोटा निबंध लिहा. निबंधात सुरुवात, माहितीपर मध्य आणि शेवट आले पाहिजेत.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

७. वरील पाठातील इंग्लिश शब्द मराठीत लिहा.

______________________________________________

______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## १३ - डहाणूची भटकंती

दोन वर्षांपूर्वी आम्ही भारतात गेलो होतो. तेव्हा भारतात पावसाळा होता. त्या सुट्टीत अख्खा एक आठवडा मी मामाकडे राहीले होते. माझा मामा ठाण्याला असतो. माझी मामेबहीण व मी साधारण एकाच वयाच्या आहोत. माझा मामेभाऊ आम्हा दोघींहून चार वर्षांनी मोठा आहे. आम्हा तिघांना एकत्र हुंदडायला खूप आवडतं. ह्या सुट्टीत एक दिवस असेच आम्ही भटकायला डहाणूला गेलो.

डहाणू गाव ठाणे जिल्ह्यात आहे. गावाला सुंदर आणि शांत समुद्रकिनारा आहे. गावाजवळ एक किल्ला आहे. पूर्वी इथल्या परिसरात पुष्कळ आदिवासी लोक होते. आजही तिथे आदिवासी पारंपरिक सण साजरे करतात.

सर्वात विशेष म्हणजे मी तिथे वारली चित्रकला बघितली. वारली चित्रकलेचा भारताशी संबंध आहे असे साधारण मला माहिती होते. पण त्या चित्रकलेचा उगम असलेले एक ठिकाण डहाणू आहे हे मला नवीन कळले. मला चित्रकला आवडते. त्यामुळे वारली चित्रांचा इतिहास ऐकायला मला आवडले आणि मजासुद्धा वाटली. वारली चित्रांची मजा लुटून आम्ही समुद्रावर गेलो.

समुद्रकिनारी पोहोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. तिथे लोकांची फारशी गर्दी नव्हती. खूप शांत, छान वाटत होतं. आम्ही वाळूवर बसून भरपूर गप्पा मारल्या. थोडा वेळ पाण्यात खेळलो.

लाटांशी खेळत असताना आकाशात छान छान रंग दिसू लागले. सूर्यास्ताचे सुंदर रूप आठवत आम्ही घरी परत आलो.

रात्री जेवणानंतर डहाणूच्या गप्पा रंगल्या. गप्पा मारताना मला कळले की माझी आई अतिशय सुंदर वारली चित्र काढते. ते ऐकून मला खूपच आनंद झाला.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

भारतातून निघण्यापूर्वी एक वारली चित्र काढायचा <u>हट्ट</u> मी आईकडे धरला. आईने तारेवरची <u>कसरत</u> केली आणि माझा हट्ट पूर्ण केला.

आईने काढलेले ते चित्र आता आम्ही आमच्या घरात लावले आहे. माझ्यासाठी ते चित्र म्हणजे भारताच्या सुट्टीची आणि विशेष करून डहाणूच्या <u>भटकंतीची</u> खूप गोड आठवण आहे.



**स्वाध्याय:**

**क्रियापद (Verb)**

१. मुलांना खाली दिलेल्या क्रियापदांचा अर्थ विचारा:

मारणे, धरणे, येणे, लागणे, मिळणे, लुटणे, साठवणे, रंगणे, कसरत करणे, काढणे.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

२. खालील वाक्यामधील क्रियापदांचा मूळ अर्थ लोप पावतो. संदर्भाप्रमाणे वाक्याचा अर्थ बदलतो. अशा प्रकारची खालील क्रियापदे वापरून वाक्ये लिहा.

उदा. - गणपती उत्सवात पहिल्या दिवशी आम्ही उकडीच्या मोदकांवर ‘ताव मारतो’ / ’तुटून पडतो’.

| |
|---|
| गप्पा मारल्या / थापा मारल्या / हाका मारल्या. |
| हट्ट धरला. |
| कल्पना आली / कल्पना सुचली. |
| दिसू लागल्या / कळू लागल्या. |
| पहायला मिळाली. |
| मजा लुटली / आनंद लुटला. |
| रूप साठवले. |
| गप्पा रंगल्या / गप्पा रंगवल्या. |
| तारेवरची कसरत केली. |
| चित्र काढले / पैसे काढले / उकळी काढली / केर काढला / वेळ काढला. |

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

३. खाली महाराष्ट्राचा नकाशा दिला आहे. डहाणू नकाशात कुठे आहे ते शोधा व खालील नकाशात दाखवा.



मदतीसाठी विकिपीडियावर जाऊन पहा. (http://en.wikipedia.org/wiki/Dahanu)

४. तेव्हा, त्यामुळे, पण, तोपर्यंत अशा प्रकारचे शब्द/अव्यय वापरून दोन वाक्ये जोडता येतात. धड्यामधील असे इतर शब्द शोधा. अशा प्रकारचे शब्द वापरून वाक्यात उपयोग करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

५. आठवतंय, लाभलाय असे शब्द बोली भाषेत जास्त वापरले जातात. त्यात “आहे” हा शब्द लपलेला असतो. ह्या शब्दांची फोड कशी होते ते खाली पहा.

आठवतंय - आठवत आहे

लाभलाय - लाभला आहे

६. गणिती शब्दकोडे सोडवा. उत्तर अंकात व शब्दात असे दोन्ही प्रकारे लिहा.

(१) मी चौदा वर्षांची आहे. अजून पंचवीस वर्षांनी माझे वय काय असेल?

______________________________

______________________________

(२) एक हजार वह्या दोनशे पन्नास मुलांना समान वाटल्या. तर प्रत्येक मुलाला किती वह्या मिळतील?

______________________________

______________________________

(३) वर्षातले एकशे ऐंशी दिवस मी पोहायला जातो. त्या प्रत्येक दिवशी मी अर्धा तास पोहतो. तर वर्षात एकूण किती तास माझे पोहणे होते?

______________________________

______________________________


© BMM Copyright 2023. All rights reserved.

(४) एका टेनिस बॉलची किंमत ब्याण्णव सेंट्स आहे. तर तीन टेनिस बॉल्सची किंमत किती?

__________________________________________________

__________________________________________________

७. तुम्हाला खालील चित्र ओळखीचे आहे का? नसल्यास “शोधा म्हणजे सापडेल”!



त्या चित्राचे तुमच्या शब्दात वर्णन करा. तुम्हाला कितीतरी गमतीजमती, आणि कितीतरी बारकावे सापडतील.

__________________________________________________

__________________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

**माहितीसाठी:**

इंग्रजीत एका शब्दाची अनेक क्रियापदे असतात. त्यांना पर्यायी मराठी क्रियापदे मात्र दोन शब्द वापरून तयार होतात. ही संकल्पना मुलांना समजावून सांगावी.

उदा. - to jump - उडी मारणे

to study - अभ्यास करणे

to chat - गप्पा मारणे

to sweep - केर काढणे

to clean - स्वच्छ करणे

to insist - आग्रह करणे/धरणे.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## १४ - निसर्ग

निसर्ग म्हणजे कोणी जादूगारच आहे की काय? तो दररोज आकाशात दोन मोठे दिवे लावतो. एक सकाळी आणि एक रात्री. सकाळचा दिवा म्हणजे सूर्य. रात्रीचा दिवा म्हणजे चंद्र. सूर्य प्रखर असतो, तर चंद्र थंड, शीतल असतो. सूर्यामुळे निसर्गाचे जलचक्र चालते. चंद्रामुळे समुद्रात भरती-ओहोटी येते.

समुद्र हीसुद्धा निसर्गातील एक मोठी जादू आहे असं वाटतं. किती अफाट असतो समुद्र! नजर जाईल तिकडे पाणीच पाणी दिसते. अगदी क्षितीजापर्यंत. एवढे पाणी आले तरी कुठून? समुद्राच्या लाटा पहात समुद्रकिनारी तुम्ही कधी उभे राहिले आहात का? किती विलक्षण वाटते, नाही का?

समुद्राला जेव्हा भरती येते तेव्हा समुद्राच्या लाटा किनारा गाठू पाहतात. ओहोटीच्या वेळी मात्र समुद्राकाठची बरीचशी वाळू कोरडीच असते. भरती-ओहोटीचे वेळापत्रक ठरलेले असते. मराठी तिथी पाहून त्या दिवशी समुद्राला भरती असेल की ओहोटी असेल हे कळते. त्यामागचे सविस्तर कारण तुम्ही स्वतःच शोधून काढा.

निसर्गातल्या जलचक्राचेसुद्धा वेळापत्रक ठरलेले असते. सूर्याच्या उष्णतेने समुद्राच्या पाण्याची वाफ होते. वाफ वर आकाशात जाते. वाफेचे ढग तयार होतात. ढगांना गार हवा लागली की वाफेचे पाणी होते. ढगांमधून हे पाणी खाली पडते. ह्यालाच पाऊस म्हणतात. पावसाच्या पाण्याने नद्या, नाले, तलाव भरून वाहू लागतात. डोंगरांमधून झरे वाहू लागतात. वाहणारे सर्व पाणी शेवटी समुद्राला जाऊन मिळते. अशाप्रकारे जलचक्र पूर्ण होते.

निसर्गाची ही जादू अशा प्रकारे चालू रहायला इतर कितीतरी गोष्टी आवश्यक आहेत. उदा. पाऊस पडायला पुरेशी झाडं, जंगलं हवीत. ढग अडवायला पुरेसे डोंगर, टेकड्या हव्यात. प्रदूषण जितके कमी असेल तितके चांगले असते. बांधकाम किंवा

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

इतर कोणतेही काम करताना त्या कामामुळे निसर्गाचे <u>नुकसान</u> होणार नाही ही काळजी घ्यायला हवी.

जर आपण योग्य काळजी घेतली तर निसर्ग त्याच्या जादूंनी आपल्याला नेहमी <u>सुखावत</u> राहील.

**स्वाध्याय:**

१. गाळलेले शब्द भरा.

(खबरदारी, विशाल, अफाट, प्रखर, नजर, नुकसान, शीतल, उसळले, योग्य, काळजी)

१) चंदनाचा लेप शरीरासाठी ................ असतो.

२) उन्हाळ्यात भर दुपारी .................... ऊन असते.

३) हत्तीची ताकद .................... असते.

४) ती सभा एका .................... पटांगणावर आयोजित केली होती.

५) लहान मुलाची .................... स्थिर व्हायला काही दिवस लागतात.

६) कोणाला कळायच्या आत त्याने सूर मारला आणि पाणी वर .................... .

७) आजी आम्हाला नेहमीच .................... सल्ला देते.

८) आपल्यामुळे इतरांना .................... पोहोचणार नाही ह्याची ............................... आपण सदैव घेतली पाहिजे.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

२. खालील दिलेले समानार्थी किंवा विरुद्धार्थी शब्द वापरून समर्पक वाक्ये तयार करा, क्रियापदात व इतर शब्दात आवश्यक तो बदल करा.
(गरम झाले, वाफ, नेहमी, भरपूर, गोठले, बर्फ, पद्धतशीरपणे, जादू, जादूगार, कधीच, पाण्याचा तुटवडा नसतो, बंधने)

समानार्थी शब्द:

१) जो किमया करून दाखवतो त्याला किमयागार म्हणतात.

---

२) त्या नदीला कायम मुबलक पाणी असते.

---

३) पाणी तापले की पाण्याचे बाष्प होते.

---

४) शिस्त लागावी यासाठी कधी-कधी नियंत्रण आवश्यक असते.

---

५) माझी आजी आज नव्वद वर्षांची आहे. तरीही तिच्या रोजच्या गोष्टी अगदी सुरळीतपणे चालू असतात.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

विरुद्धार्थी शब्द: (वाक्याचा अर्थ तोच राहतो)

१) त्या नदीला कायम मुबलक पाणी असते.

२) पाणी तापले की पाण्याचे बाष्प होते.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# १५ - पन्हाळगड - बाजीप्रभूंचे बलिदान

**(महाराष्ट्राच्या इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराजांची एक गोष्ट )**



अफझलखानाच्या वधानंतर शिवाजी महाराजांनी आदिलशाही मुलुखावर स्वाऱ्या करून स्वराज्याचा विस्तार करायला सुरुवात केली. तेव्हा त्यांना रोखण्यासाठी विजापूरचा सरदार रुस्तुम-ए-जमान आणि अफजल खानाचा मुलगा, फाझलखान स्वराज्यावर चालून आले. पण महाराजांच्या सैन्याने त्यांचाही पाडाव केला. त्यानंतर खवळलेल्या आदिलशाहने मार्च १६६० मध्ये महाराजांचे पारिपत्य करण्यासाठी सिद्धी जौहर नावाच्या सरदाराला पाठवले. शिवाजी महाराज त्यावेळी पन्हाळगडावर होते. सिद्धी जौहरने त्याच्या घोडदळ, पायदळ आणि तोफखान्यासह पन्हाळगडाला वेढा घातला. तब्बल चार महिने महाराज आणि त्यांचे सहकारी

© BMM Copyright 2023. All rights reserved.

सिद्धी जौहरच्या या कडक वेढ्यात अडकून पडले होते. पावसाळा सुरु झाला तरी देखील सिद्धी हार मानायला तयार नव्हता.

अखेरीस जुलै महिन्यात शिवाजी महाराजांनी पुन्हा एकदा युक्तीचा वापर करून सिद्धीला आपल्या जाळ्यात ओढले. महाराजांनी आपल्या वकिलाबरोबर सिद्धीला निरोप पाठविला की, 'आपण मला अभय देण्यास तयार झालात तर मी आपल्याशी तह करायला तयार आहे. मी लवकरच आपल्याला प्रत्यक्ष येऊन भेटेन.' महाराजांच्या या पत्रामुळे सिद्धी आणि त्याच्या सैन्याला अतिशय आनंद झाला, आणि त्याचे सैन्य गाफील झाले, वेढा ढिला पडला. त्या संधीचा फायदा घेऊन १२ जुलै १६६० रोजी रात्रीच्या अंधारात ६०० बांदल मावळ्यांसह राजांनी विशाळगडाकडे कूच केले. त्याचवेळी शिवा काशीद नावाचा न्हावी महाराजांच्या रूपात निवडक सैनिकांसह सिद्धीच्या सैनिकांना हूल देण्यासाठी निघाला. तो सिद्धीच्या सैनिकांच्या तावडीत सापडला आणि त्यांनी त्याला सिद्धी जौहर समोर सादर केले. आपल्या सैनिकांची चूक लवकरच सिद्धीच्या लक्षात आली आणि त्याने रागाने शिवा काशीदला ठार केले.

तिकडे सिद्धी जौहरचा जावई, सिद्धी मसूदच्या सैन्याने राजांच्या तुकडीला गजापूरच्या घोडखिंडीजवळ गाठले. त्या कसोटीच्या क्षणी बांदलांचे सरनौबत, बाजीप्रभू देशपांडे यांनी राजांना ३०० मावळ्यांबरोबर विशाळगडाच्या दिशेने कूच करण्याचा सल्ला दिला आणि ते स्वतः ३०० मावळ्यांबरोबर सिद्धी मसूदच्या

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

सैन्याला तोंड देण्यास सिद्ध झाले. विशाळगडावर सुखरूप पोहोचल्याची निशाणी म्हणून महाराज तोफांची सरबत्ती करणार होते.

महाराज विशाळगडाजवळ पोहोचले तेव्हा जसवंतराव दळवी व सूर्याजी सुर्वे यांनी विशाळगडाला वेढा घातला होता. विशाळगडावरून महाराजांना मराठा सैन्याची कुमक मिळाली आणि वेढा फोडून ते गडावर दाखल झाले.

इकडे घोडखिंडीमध्ये बाजीप्रभू आणि बांदलांच्या तुकडीने पराक्रमाची शर्थ करून शत्रूला खिंडीत अडविले. बाजीप्रभूंना देहभर जखमा झाल्या होत्या. पण महाराज विशाळगडावर पोहोचल्याच्या खुणेचा, तोफेचा आवाज ऐकू येईपर्यंत ते प्राणपणाने खिंड लढवत राहिले. तोफेचा आवाज ऐकल्यानंतरच बाजीप्रभूंनी देह ठेवला. बाजीप्रभू आणि बांदलांच्या रक्ताने घोडखिंड पावन झाली.

आजही ही खिंड पावनखिंड म्हणून ओळखली जाते. बाजीप्रभू आणि बांदलांचे बलिदान स्वराज्याच्या इतिहासात अजरामर झाले.

कथा- सौ कादंबिनी धारप

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

**स्वाध्याय :**

१. आदिलशाहने महाराजांचे पारिपत्य करण्यासाठी कोणत्या सरदाराला पाठवले?

२. शिवाजी महाराज कोणत्या गडावर अडकून पडले?

३. सिद्धी जौहरचा वेढा किती दिवस चालू होता?

४. महाराज वेढ्यातून निसटले ती तारीख कोणती?

५. महाराजांच्या रूपात सिद्धीला हूल कोणी दिली?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

६. सिद्धी जौहरच्या जावयाचे नाव सांगा.

७. विशाळगडाला वेढा कोणी घातला?

८. विशाळगडावर पोहोचल्याची खूण म्हणून महाराजांनी काय केले?

९. रिकाम्या जागा भरा:

१. -------------- बांदल यांचे सरनौबत होते.

२. गजापूरच्या ------------- जवळ महाराजांचे सैन्य अडकले.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## १६ – पॉप फट पॉप

(**मुलांचा रंगमंच:** हा प्रसंग बागेत घडत आहे. खो-खो खेळून मुले खूप दमलेली आहेत. त्यांना काहीतरी खायला पाहिजे आहे...)

**पात्रपरिचय:**

आवाज एक आवाज दोन आवाज तीन
आवाज चार आवाज पाच आवाज सहा
फेरीवाला फेरीवाल्याची नात

**सगळे:** व्वा! काय मस्त खेळ झाला!
**आवाज एक:** अरे, खो-खो खेळून मस्त भूक लागलीये आता.
**आवाज दोन:** मला पण!
**आवाज तीन:** मला सुद्धा!
**आवाज चार:** आत्ता आपल्याकडे काहीतरी खाऊ असता तर काय मज्जा आली असती नाही?
**आवाज पाच:** हो ना. काहीतरी <u>हलकं</u>, पॉपकॉर्न सारखे...
**आवाज सहा:** हो ना. काहीतरी <u>कुरकुरीत</u>, पॉपकॉर्न सारखे...
**आवाज एक:** हो ना. काहीतरी <u>खारट</u>...
**सगळे:** पॉपकॉर्न सारखे!
**आवाज दोन:** बरोबर! काहीतरी अगदी...
**सगळे:** पॉपकॉर्न सारखे!
**आवाज तीन:** पण आपली इच्छा पूर्ण कशी होणार?
**आवाज चार:** इथे आपल्याला पॉपकॉर्न कसे मिळणार?
**आवाज पाच:** ते सुद्धा इथे बागेत?
**सगळे:** अगदी <u>अशक्य</u> आहे. आणि <u>हास्यास्पद</u>!
**आवाज पाच:** हे मात्र खरं बोललास.
**आवाज सहा:** त्यासाठी काहीतरी जादूच झाली पाहिजे.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

**आवाज एक:** एsss, ते बघा, ते बघा!

**आवाज दोन:** कुठे? कुठे?

**आवाज तीन:** तेsss बघ तिकडे. रस्त्यावर.

**आवाज चार:** तो फेरीवाला हातगाडी घेऊन चालला आहे का?

**आवाज पाच:** हो. आणि ती छोटी मुलगी त्याच्या शेजारी उड्या मारतीये.

**आवाज सहा:** आणि त्या जुन्या पुराण्या, लाल-लाल हातगाडी मध्ये काय असेल बरं?

**आवाज एक:** तो फेरीवाला आपल्याकडे बघून हसतोय.

**आवाज दोन:** आणि आपल्याला हात करून बोलावतोय.

**आवाज तीन:** जणू काही आपल्यासाठी काहीतरी गम्मत आहे त्याच्याकडे.

**फेरीवाला:** इकडे या ताई, माई, **अक्का**. पॉप फट काय होतंय **ऐका**!

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**आवाज एक:** मला ऐकू येतंय.

**सगळे:** आम्हाला ऐकू येतंय.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**फेरीवाला:** मक्याच्या बिया भरकन **फुलतात**. पांढऱ्या लाह्या खुदकन **हसतात**.

**आवाज दोन:** मला दिसतंय.

**सगळे:** आम्हाला दिसतंय.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**फेरीवाला:** लोण्याचा गंध मस्त **येतो**. वाऱ्याबरोबर **दरवळतो**.

**आवाज तीन:** मला वास येतोय.

**सगळे:** आम्हाला वास येतोय.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

**फेरीवाला:** तडतड थांबली. लाह्या तयार झालेल्या दिसतायत.

**आवाज चार:** मग, बघायचं का पॉपकॉर्न कसे लागतायत?

**फेरीवाला:** या रे या, सगळे या. पॉपकॉर्न ची माझ्या चव बघा या.

**मुलगी:** पॉप फट पॉप!

© BMM Copyright 2023. All rights reserved.

**आवाज पाच:** कुरकुरीत चव तर छानच आहे.
**सगळे:** कुरकुरीत चव तर छानच आहे. पॉप फट पॉप!

**स्वाध्याय:**

१. पॉपकॉर्न कसे दिसतात?

_______________________________________________

२. पॉपकॉर्न चा आवाज कसा येतो?

_______________________________________________

३. पॉपकॉर्नचा वास कसा येतो?

_______________________________________________

४. पॉपकॉर्न कसे लागतात?

_______________________________________________

अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ निवडा.
५. तो <u>फेरीवाला</u> आहे का?
अ) स्वयंपाक करणारा
आ) जादू करणारा
इ) वस्तू विकणारा
ई) गाणी गाणारा

६. त्या जुन्या <u>पुराण्या</u>, लाल-लाल हातगाडी मध्ये काय असेल?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

अ) मोडून गेलेली

आ) पॉपकॉर्न भरलेली

इ) छान वास येणारी

ई) खूप जुनी

७. लोण्याचा <u>गंध</u> मस्त येतो. वाऱ्याबरोबर दरवळतो.

अ) गरम

आ) छान चव

इ) वास

ई) जोराचा वारा

८. पांढऱ्या <u>लाह्या</u> खुदकन हसतात.

अ) पॉपकॉर्न ची पिशवी

आ) एक प्रकारचे फूल

इ) मुलगी

ई) फुललेले दाणे

९. खालील अर्थाचे जोडशब्द शोधून त्याच्या खाली रेघ मारा.

लागली आहे

हसतो आहे

येत आहे

दिसत आहेत

बोलावतो आहे

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## १७ – माझा नवीन मित्र

माझ्या नवीन मित्राचे नाव आहे वाघ्या. तो मला आमच्या शाळेच्या जत्रेत भेटला. आता वाघ्या हे नाव जरा वेगळेच आहे, नाही का? पण असतात कोणाची नावं जरा वेगळी. आता माझे नाव आहे मोरू. लोकांना माझ्या नावाचे सुद्धा थोडे आश्चर्य वाटते.

दरवर्षी आमच्या शाळेचे संमेलन असते. खूप खेळ असतात. सगळ्या मुलांचे आई-बाबा, छोटे भाऊ-बहीण येतात. काही मुलांना या छोट्या भावंडांना मदत करायचे काम मिळते. दुर्दैवाने मलाही तेच काम मिळाले. लहान मुलांची काळजी घ्यायचे काम मला अजिबात आवडत नाही. असं बघा, मला सुद्धा एक छोटी बहीण आहे. आणि ती मला सारखी सतावून सोडते. पण या कामातून एक गोष्ट मात्र चांगली घडली. मला तिथे वाघ्या भेटला.

तसं जत्रेतील माझं काम काही वाईट नव्हतं. मी छोट्या मुलांना तट्टू वरून फेरी मारून आणत होतो. तट्टू खूप शांत आणि समजूतदार होता. त्याला बहुतेक मुलं खूप आवडत असावीत. मला मात्र मुलांना रांगेत थांबा म्हणून सांगण्याचा कंटाळा आला होता. त्यांच्या रडण्याचा कंटाळा आला होता. पण सगळ्यात जास्त कंटाळा आला होता तो फेरी मारत असताना त्यांचं आईस्क्रीम पकडण्याचा. छे, मोठेपणा बरोबर फारच जबाबदारी येते!


दिवस अजून निम्मा सुद्धा संपला नव्हता, पण माझ्या अंगावर ठिकठिकाणी आईस्क्रीम सांडलं होतं. तेवढ्यात एक छोटा मुलगा किंचाळत रिंगणात आला. “आई गं,” मी विचार केला, “आणखी एक रडणारं बाळ का?”

तेवढ्यात त्या मुलाने तट्टू लगाम धरून ओढला. बिचारा तट्टू, एकदम थांबला. त्याच्या पाठीवर बसलेला मुलगा घसरून पडायला लागला. मी त्या मुलाला पकडायला झेपावलो. तेवढ्यात माझ्या पायांमधून एक तपकिरी रंगाचा केसाळ चेंडूच पुढे झेपावला.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

वाघ्यानी तट्टूचा लगाम ओढून त्याला पडणाऱ्या मुलापासून बाजूला नेले. आणि मी त्या मुलाला जमिनीवर पडता-पडता झेलले. मी खाली आणि तो मुलगा माझ्या अंगावर पडला. माझ्या चेहऱ्यावर सांडलेल्या आईस्क्रीमकडे बघून तो हसत होता. “वा, छान!” मी माझी पाठ चोळता-चोळता विचार करत होतो. “पुढच्या वेळेला तुला तसाच पडून देईन.”

मी वाघ्याकडे पहिले. तो अजून तट्टूचा लगाम तोंडात धरून उभा होता. त्याने तट्टूला पुढे ओढलं नसतं, तर मी नक्कीच त्याच्या पायावर आदळलो असतो. वाघ्यामुळेच आज मी आणि तो मुलगा वाचलो होतो.



वाघ्या, जगातील सर्वात हुशार आणि चपळ कुत्रा, आणि मी एकदम घट्ट मित्र झालो होतो.

**स्वाध्याय:**

आत्मकथन (personal narrative) म्हणजे स्वतः बद्दल एखादी गोष्ट.

आत्मकथनात खालील मुद्दे महत्त्वाचे आहेत.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

| | |
|---|---|
| प्रथमपुरुषी निवेदन | <u>मला</u> <u>माझा</u> नवीन मित्र कसा मिळाला... |
| कथानक - एखाद्या प्रसंगाचे वर्णन | स्वतःबद्दल एखाद्या खऱ्या अथवा काल्पनिक प्रसंगाचे वर्णन. प्रसंगात एखादी अडचण असते आणि त्यावर केलेला उपाय असतो. |
| सुरुवात, मध्य आणि शेवट | गोष्टीची थोडक्यात सुरुवात<br>मुख्य प्रसंगाचे वर्णन<br>शेवटी गोष्टीचे सार |
| परिच्छेद वापरा | आत्मकथनात परिच्छेदांचा वापर करा. एका परिच्छेदात एकच संकल्पना (idea) मांडा. |
| आपल्या मनातले विचार आणि भावना मांडणे | गोष्टीतला प्रसंग घडत असताना तुमच्या मनात काय विचार येत होते? प्रसंगाबद्दल अथवा इतर व्यक्तींबद्दल तुम्हाला काय वाटत होते? |
| संवाद | स्वतःशी अथवा इतरांशी संवाद. संवाद अवतरण चिन्हात लिहा. |
| गोष्टीला नाव देणे | तुमच्या कथानकाला नाव द्या. त्यातून तुमच्या कथानकाबद्दल वाचकाला उत्सुकता वाटली पाहिजे. |

एखाद्या प्रसंगाबद्दल आत्मकथन लिहा. वरील सर्व मुद्द्यांचा वापर करा.

___

___

© BMM Copyright 2023. All rights reserved.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# १८ - खोपा



अरे खोप्यामधी <u>खोपा</u>
<u>सुगरणीचा</u> चांगला
देखा पिलांसाठी तिने
झोका झाडाले <u>टांगला</u>

पिलं निजले खोप्यात
जसा झुलता <u>बंगला</u>
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला

खोपा <u>विणला</u> विणला
जसा <u>गिलक्याचा</u> <u>कोसा</u>
पाखराची <u>कारागिरी</u>
जरा देख रे माणसा

तिची <u>उलूशीच</u> चोच
तेच दात, तेच ओठ
तुला दिले रे देवाने
दोन हात दहा बोटं

\- बहिणाबाई चौधरी

© BMM Copyright 2023. All rights reserved.



**स्वाध्याय:**

खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा:

बंगला, विणला, कामगिरी, खोपा, टांगला

© BMM Copyright 2023. All rights reserved.

पहिल्या कडव्यात चांग<u>ला</u> आणि टांग<u>ला</u> या दोन शब्दात शेवटी “ला” हा उच्चार (syllable) आला आहे. पुढील कडव्यात असे शब्द शोधा.

(२) ---------------------------------------------

(३) ---------------------------------------------

(४) ---------------------------------------------

तुम्ही विचार करून आणखी दोन जोड्या लिहा:

---------------------------------------------

---------------------------------------------

“तिचा पिलामध्ये जीव” या वाक्याचा अर्थ काय असेल? तुमचा जीव कशात आहे?

ही कविता का लिहिली आहे असे तुम्हाला वाटते?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# १९ - विनायक दामोदर सावरकर



वि. दा. सावरकरांची ओळख काय काय म्हणून करून द्यायची? ते स्वातंत्र्य सैनिक होते. ते कवी आणि लेखक होते. त्यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेत पुष्कळ लिहीले, कितीतरी भाषांतरे केली. “ने मजसी ने," “जयोस्तुते" ही त्यांची काव्यं अजरामर आहेत. त्यांनी मराठी भाषेत सुधारणा करायचं काम केलं. प्राध्यापक, हुतात्मा असे कितीतरी नवीन शब्द त्यांनी मराठीत आणले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते महाराष्ट्रात रत्नागिरी येथे राहत होते. तिथे राहून त्यांनी पुष्कळ समाज सुधारणा केल्या. ते एक उत्तम वक्ता होते. हे सारे असले तरी एक “क्रांतिकारक" म्हणून सावरकर जगाला सर्वात जास्त ओळखीचे आहेत.

सावरकर तरुण असताना फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत होते. तेव्हाच त्यांच्या क्रांतिकारी कामाची सुरुवात झाली होती. त्याच सुमारास इंग्लंडला जायची संधी त्यांना मिळाली. इंग्लंडला क्रांतिकारी काम चालू ठेवायच्या इराद्याने सावरकर मे १९०६ मध्ये तिथे गेले. तिथे त्यांना रशियन क्रांतिकारक भेटले. त्यांच्याकडून सावरकरांनी बॉम्ब कसा तयार करायचा हे शिकून घेतले. अतिशय

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

हुशारीने त्यांनी लंडनमधून भारतात विविध ठिकाणी पिस्तुले पाठवली. ह्या पिस्तुलांचा भारतातील क्रांतिकारी कामाला मोठा हातभार लागला.

जानेवारी १९१० मध्ये त्यांनी लंडन सोडले व ते पॅरिसला येऊन पोहोचले. लवकरच त्यांनी लंडनला परत जायचे ठरवले. ब्रिटिश त्यांना लंडनमध्ये अटक करू शकतात हे माहित असतानाही ते लंडनला परत आले. तोपर्यंत ब्रिटिश सरकारने सावरकरांना अटक करण्यासाठी पुरेसा पुरावा मिळवला होता. सावरकर लंडनला येताच त्यांना पकडण्यात आले.

सावरकरांवर भारतात खटला भरण्याचे ठरले. ब्रिस्टल च्या तुरुंगातून सावरकरांना हिन्दुस्थानकडे घेऊन एक बोट निघाली. पूर्वी इंग्लंडमध्ये रहात असताना आपल्या मातृभूमीची तीव्र आठवण येऊन त्यांनी कळवळून सागराला विनवले होते -

'ने मजसी ते परत मातृभूमीला'

सागराने त्यांचे म्हणणे ऐकले. परंतु हिंदुस्थानात नेले ते कारावासासाठी!

बोट मार्सेलिस च्या किनाऱ्याजवळ आली. मार्सेलिस हा फ्रान्सचा किनारा होता. बोटीवर कडक पहारा होता. अशा कडक पहाऱ्यात असतानाही असे काही अलौकिक केले पाहिजे की ज्यामुळे अख्ख्या जगात हिंदूबद्दल भीती बसेल असे सावरकरांना वाटू लागले.

अचानक त्यांच्या मनात एक विलक्षण विचार आला. त्यांनी पहारेकऱ्याला सांगितले, "मला प्रातर्विधीला जायचे आहे." पहारेकरी त्यांना घेऊन शौचकूपाकडे गेले. शौचकूपाचे दार काचेचे होते. त्यांनी आपल्या अंगातला झगा काचेच्या दारावर टाकला. सगळ्या अंगाला साबण फासला व पोर्टहोलच्या छोट्या भोकातून धाडदिशी समुद्रात उडी मारली. किती भयंकर विचार! किती कठीण निर्णय!

एवढ्याशा भोकातून आपले शरीर समुद्रात झोकताना त्यांना खूप यातना झाल्या. सारे शरीर सोलवटून निघाले. समुद्राचे खारे पाणी लागून त्यांचे अंग झोंबले

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

असेल. बापरे! कल्पनेने अंगावर काटा उभा राहतो! पण सावरकरांनी कशाची पर्वा केली नाही. ते झपाट्याने किनाऱ्याच्या दिशेने पोहत राहिले.

सावरकर सुटले हे कळल्यावर बोटीवर हाहाकार झाला. सारे पहारेकरी घाबरले. सावरकरांवर गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. त्याचा मारा चुकवत सावरकर किनाऱ्याला पोहोचले. मागोमाग ब्रिटिश पहारेकरी येतच होते. मार्सेलीस मध्ये सावरकरांना ताबडतोब कोणतीच मदत मिळाली नाही. त्यामुळे ब्रिटिश पोलिसांनी सावरकरांना पुन्हा पकडले.

सावरकरांचे हे धाडस बघता बघता जगभर पसरले. त्यांच्या धाडसाची वार्ता अनेक देशात गौरवाने वर्णिली गेली. प्रयत्न फसला, पण उद्देश सफल झाला.

अखेर डिसेंबर १९१० मध्ये सावरकरांना ५० वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली गेली. त्यासाठी त्यांना अंदमानच्या तुरुंगात ठेवण्यात आले. असे असूनही सावरकर कायम खंबीर राहिले. त्यांच्यासारखा तेजस्वी माणूस अपवादानेच होत असतो.

सावरकरांकडून शिकावं तेवढं कमीच आहे. त्यांच्या अजोड बुद्धीला, धैर्याला, जिद्दीला आपण वंदन करूया.

**माहितीसाठी:**

**सागरा प्राण तळमळला:** https://www.youtube.com/watch?v=I4pJ0aD5RtA

मोठ्यांसाठी, शिक्षकांसाठी हे व्याख्यान अतिशय मार्गदर्शक आहे. YouTube लिंक येथे देत आहोत.

Lecture on Veer Savarkar - Ram Shevalkar 1/10 and links to the following parts. OR

Veer Savarkar - Prof. Ram Shewalkar - Vyakhyanmala - Part 1 - Marathi Interview and links to the following parts.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

## २० – प्रदूषण

पुढील संवाद घरातील वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये दिवसातील वेगवेगळ्या वेळी घडतो.

संवादातील पात्रे: (जुळ्या बहिणी: विजू आणि अनु, मुलींचे आई, बाबा व आजी)

*संवाद एक (संध्याकाळची वेळ):*

**बाबा**: विजू, आजच्या अख्ख्या दिवसात तू शिकलेली कोणतीही एक नवीन गोष्ट सांग बरं.

**विजू**: आज शाळेत सामान्य विज्ञानाच्या तासाला आम्ही असं शिकलो की समुद्रात काही ठिकाणचे मासे पाण्याच्या प्रदूषणामुळे मरत आहेत.

**बाबा**: प्रदूषण म्हणजे नेमकं काय गं?

**अनु**: बाबा, मी सांगते. प्रदूषण म्हणजे निसर्गात ज्या गोष्टी आहेत त्या अशुद्ध करणे, खराब करणे.

**विजू**: आणि असं केल्याने माणसांना, पशुपक्ष्यांना, पूर्ण जीवसृष्टीला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

**अनु**: हो ना! जसे कारखान्यातून किंवा गाड्यातून निघणारा धूर, उघड्यावर किंवा पाण्यात टाकलेला कचरा... हे सगळे प्रदूषणाचे प्रकार आहेत.

*संवाद दोन (रात्रीची वेळ):*

**बाबा**: अगं ऐकलं का! आज म्हणे ह्या दोघीना प्रदूषण आणि त्याचे प्रकार याविषयी शिकवलं!

**आई**: अच्छा! मग मुलींनो, मला सांगा की हे प्रदूषण करतो कोण?

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

**विजू, अनु**: आपण माणसं!

**आई**: आणि आपण ते <u>टाळू </u>शकतो का?

**विजू**: टाळणं <u>खरंच</u> सोपं आहे. त्यासाठी माणसाने <u>अखंड</u> <u>जागरूक</u> रहायला हवं!

**अनु**: बरोबर. माणसाने आपण काय करत आहोत आणि त्याचा परिणाम काय होणार आहे याचा अखंड विचार करायला हवा.

**बाबा**: बापरे! तुम्ही <u>तर</u> <u>एकदम</u> मोठ्यांसारखंच बोलताय!

**अनु**: अहो बाबा! आता आम्ही मोठ्या झालोय. आम्हाला कळतात <u>छोट्या मोठ्या</u> गोष्टी!

*<u>संवाद तीन (दुसऱ्या दिवशी सकाळची वेळ):</u>*

**आजी**: अरे किती मोठ्याने रेडिओ लावून ठेवलाय! अरे माधवा, आवाज कमी कर पाहू!

**बाबा**: (थट्टेने) अगं आई, हा काय मोठा आवाज आहे का! कमी आहे की आवाज!

**आई**: (मिश्किलपणे) अहो, कमी करा नाहीतर मुलीपण येतील ध्वनी प्रदूषणाचे <u>धडे द्यायला</u>!

**बाबा**: (हसत हसत) अरे हो! कालच शिकून आल्या आहेत नाही का! पहिला आवाज कमी करतो! सकाळी सकाळी माझा धडा नको घ्यायला!

**आजी**:(हसून) छान! वडिलांनी मुलींना <u>धाक</u> देण्याऐवजी गंगा <u>उलटी</u> <u>वाहते</u> म्हणायची!

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

**आई**: (हसून) काय करणार सासूबाई! काळ बदललाय! आम्हाला काळाप्रमाणे बदलायला हवं!

**आजी**: खरं बोललीस अगदी! कालाय तस्मै नमः!

**स्वाध्याय:**

१. तुमच्या घरात कोण कोण आहे? त्यांची नावे सांगा.

___

२. तुमच्या घरात वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये झालेला एखादा संवाद लिहून आणा. संवाद छोटासा असेल, व २-३ व्यक्तींमध्येच झाला असेल तरी चालेल.

___

___

___

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

पुढीलपैकी कोणत्या सवयी चांगल्या व कोणत्या वाईट ते लिहा.

१. पाणी वाया न घालविणे / नळ आवश्यक तितकाच वेळ सोडून पाण्याचा वापर गरजेपुरता करणे -

२. रस्त्यावर कचरा फेकून देणे -

३. तलावाच्या पाण्यात झाडाच्या सुकलेल्या फांद्या टाकणे -

४. नम्रपणे बोलणे -

५. जेवणापूर्वी हात स्वच्छ धुणे / जेवणानंतर हात, तोंड स्वच्छ धुणे -

६. किंचाळून बोलणे -

७. लोकांची वस्ती असलेल्या ठिकाणी मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपक लावून कार्यक्रम करणे -

८. गरज असेल तेव्हाच कागद छपाई करणे / क्षुल्लक कारणासाठी कागद छपाई टाळणे -

वरील उता-यात प्रदूषणाचे कोणते प्रकार आले आहेत? त्याव्यतिरिक्त प्रदूषणाचे अजून कोणते प्रकार तुम्हाला माहिती आहेत?

---

---

प्रदूषण हा पृथ्वीसाठी एक मानवनिर्मित धोका आहे. तो टाळण्यासाठी तुम्ही कोणती काळजी घेता किंवा यापुढे घ्याल?

---

---

© BMM Copyright 2023. All rights reserved.

प्रदूषणासारखे पृथ्वीला भेडसावणारे इतर मानवनिर्मित धोके तुम्हाला माहिती आहेत का? तुम्हाला असलेली माहिती सांगा.

________________________________________

________________________________________

वरील संवादामध्ये विजू आणि अनु अशी टोपण नावे आली आहेत. गंमत म्हणून त्या मुलींची खरी नावं काय असू शकतात याचा अंदाज बांधा.

________________________________________

________________________________________

आज कोणते नवीन मराठी शब्द, किंवा माहिती असलेल्या मराठी शब्दांचा नवीन पद्धतीने वापर तुम्हाला कळला?

________________________________________

________________________________________

________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

## उजळणी - सराव

**खालील अंक आणि शब्द वाचा व शब्दात /अंकात लिहा**

१)

८३७४:______________________________________

__________________________________________

२)

३९७१:______________________________________

__________________________________________

३)

९९९९:______________________________________

__________________________________________

४) चार हजार पाच:

________________________________________

__________________________________________

५) दोन हजार सत्तेचाळीस :

________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

६) सात हजार एक :

**खालील गणिते सोडवा व पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा.**

१. एका शेतकऱ्याने आपल्या शेतात ५७४ कापसाची व २०१९ गव्हाची रोपे लावली तर त्याने आपल्या शेतात एकूण किती रोपे लावली ?

२. एका समर कॅम्पमधे ७८० मुले होती. प्रत्येक १० मुलांचा एक गट तयार केला तर असे किती गट तयार होतील?

© BMM Copyright 2023. All rights reserved.

३.एका गावात ९५४९ माणसे रेल्वेने प्रवासात,  ६२२७ बसने प्रवास करतात व ५०९१ कारने प्रवास करतात. तर त्या गावात रोज किती माणसे प्रवास करतात?

४. शाळेच्या कॅफेटेरियात स्ट्रॉबेरी जेलीच्या ८२० बाटल्या होत्या. त्यांनी संत्र्याच्या जेलीच्या १४८० बाटल्या विकत घेतल्या तर दोन्ही मिळून कॅफेटेरियात किती बाटल्या जेली आहे?

५. एका पेटीत ६०६७ मणी आहेत त्यात २४३७ लाल मणी आहेत, तर लाल मणी सोडून इतर मणी आहेत?

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

**खालील संख्या शब्दात लिहा.**

१. ९५४८

---

२. ६४५३

---

३. ४६९७

---

४. ३८६८

---

५. २६७३

---

६. ११०३

---

७. ७७७५

---

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

८. ५६९३

_______________________________________________

९. ८३२१

_______________________________________________

१०. १८१९

_______________________________________________

**खालील माहिती वाचा आणि प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा.**

उन्हाळ्यात अमित लिंबू सरबत बनवून पॉकेट मनी मिळवतो. त्यासाठी लागणारे सामान तो आईबरोबर जाऊन दुकानातून आणतो. त्याच्या शेजारचे लोक लिंबू सरबत प्यायला गर्दी करतात.

सरबतासाठी लागणारे सामान :

१. पाणी - १००० ml ( मिलिलिटर)

२. लिंबाचा रस - २०० ml (मिलिलिटर)

३. साखर - २७५ g (ग्रॅम )

४. मीठ - २५ g (ग्रॅम )

एकूण सरबत - १५०० ml

एक ग्लास सरबत - १००ml, एक ग्लास सरबताची किंमत - २ डॉलर

© BMM Copyright 2023. All rights reserved.

१. लिंबाचा रस आणि पाणी मिळून किती मिलिलिटर (ml) होतात?

_______________________________________________

२. साखर आणि मीठ मिळून किती ग्राम ( g) होतात?

_______________________________________________

३. अमितने सातशे ग्लास सरबत विकले तर किती डोलारा मिळतील?

_______________________________________________

४. वर दिलेल्या रेसिपी तिप्पट केली तर एकूण किती मिलिलिटर (ml) सरबत तयार होईल?

_______________________________________________

© BMM Copyright 2023. All rights reserved.

५. वर दिलेली रेसिपी दहापट केली तर किती ग्राम ( g) साखर लागेल?

________________________________________________________________

६. अमितने एकूण दहा हजार मिलिलिटर (ml) सरबत केले तर त्यामध्ये किती ग्लास विकता येतील?

________________________________________________________________

**कंसातील योग्य शब्द निवडून गाळलेल्या जागी लिहा.**

१. सूर्याची ऊर्जा आपल्यापर्यंत प्रकाश आणि ________________ रुपाने पोहोचते.

(अवर्षणाच्या, उष्णतेच्या, ग्रहणाच्या )

२. मालवाहू जहाजांची जलमार्गाने वाहतूक होण्यासाठी ____________ आवश्यकता असते.

(कार्यालयाची, स्थानकांची , बंदरांची )

३. वातावरणाच्या ________________ प्रमाणे आकाशातून, पाणी वेगवेगळ्या रूपात पडते. (तापमाना , बाष्पीभवना , धूलिकणा )

४. समर्थ रामदासांनी जागोजागी ________________ देवळे बांधली.

© BMM Copyright 2023. All rights reserved. 

( श्रीकृष्णाची, हनुमानाची , शंकराची )

५. चंद्र हा पृथ्वीचा ______________ आहे. ( लघुग्रह, उपग्रह , उपहारगृह )

६. सूर्यमालेतील पहिला ग्रह _____________ आहे. ( बुध , गुरु, शुक्र )

७. कारखान्यातून येणाऱ्या धुरामुळे _________________ होते. ( जलप्रदूषण , वायुप्रदूषण , ध्वनिप्रदूषण )

८. कोलंबस __________________ भारताचा शोध घ्यायला निघाला पण अमेरिकेत पोहोचला.

(लोहमार्गाने, रस्त्याने, जलमार्गाने )

९. सर्वात मोठा खंड ______________ आहे. (आशिया , अमेरिका , अंटार्टिका )

१०. पृथ्वीवर __________________ महासागर आहेत. ( चार, पाच, सात )

**खालील वाक्ये वाचून चूक किंवा बरोबर अशी खूण करा.**

१. लोहमार्गावरील वाहतुकीसाठी इंधन किंवा ऊर्जेची अजिबात जरुरी नाही. _____

२. काही पर्यटनाच्या ठिकाणी आजही लोक मोठ्या ऐटीत घोडागाडीने चक्कर मारताना दिसतात. _____

३. शाकाहारी लोक मासे खाणे टाळतात. _____

४. महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारावर भरघोस आंबा पिकतो. _____

५. सावरकरांच्या शस्त्रांनी लढण्यापेक्षा भारतात ब्रिटिशांचे राज्य मान्य होते. _____

© BMM Copyright 2023. All rights reserved.

६. गोकुळाष्टमीला गुढी उभारतात. ______

७. जलमार्ग हा वाहतुकीचा सर्वात जलद प्रकार आहे. ______

८. भात, आमटी, भाजी व पोळी हे मराठी जेवणातील मुख्य प्रकार नाहीत.

_______

९. समर्थ रामदास सज्जनगडावर राहात. _______

१०. बोटीवरून उडी मारून सावरकर मार्सेलीस पर्यंत पोहत गेले. _______

© BMM Copyright 2023. All rights reserved.

खालील चित्राचे ५-६ वाक्यात वर्णन करा.

**चित्र १ :**




© BMM Copyright 2023. All rights reserved.

**चित्र २**




© BMM Copyright 2023. All rights reserved.

## चित्र ३



Aug 5, 2012, Beijing Olympics, Usain Bolt won gold-100 meter final 9.63 sec.

**(अजून चित्रे internet वरून शोधून सराव करा.)**

© BMM Copyright 2023. All rights reserved.

**खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.**

The Earth and Moon rotate around the Sun. A solar eclipse happens when the Moon is between the Earth and the Sun. If the Earth is between the Sun and the Moon , then its shadow falls on the Moon. This is called the lunar eclipse. People used to fear eclipses in the past.

© BMM Copyright 2023. All rights reserved.

**खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.**

मला फळ्यावरची अक्षरे नीट वाचता येत नव्हती म्हणून माझे बाबा मला ऑप्टीमेट्रिस्टकडे घेऊन गेले. त्यांनी माझे डोळे तपासले आणि मला चष्मा लागेल म्हणून सांगितले. त्यांच्याकडे पुष्कळ फेम्स होत्या. माझ्या चष्म्यासाठी मी एक जांभळी फ्रेम निवडली. माझ्या मित्रांना हे मी कधी सांगेन असे मला झाले होते!

© BMM Copyright 2023. All rights reserved.

# अवांतर वाचन

## अ १ - मनाचे श्लोक

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा
मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा||
नमू शारदा मूळ चत्वार वाचा
गमू पंथ आनंत या राघवाचा||१||

मना सज्जना भक्तिपंथेची जावे
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे||
जनी निंद्य ते सर्व सोडूनी द्यावे
जनी वंद्य ते सर्व भावे करावे||२||

प्रभाते मनी राम चिंतीत जावा
पुढे वैखरी राम आधी वदावा||
सदाचार हा थोर सांडू नये तो
जगी तोचि तो मानवी धन्य होतो||३||

मना वासना दुष्ट कामा न ये रे
मना सर्वथा पापबुद्धी नको रे||
मना सर्वथा नीति सोडू नको हो|
मना अंतरी सार विचार राहो||४||

© BMM Copyright 2013. All rights reserved.

## अ २ - जे का रंजले गांजले

जे का रंजले गांजले ।
त्यांसी म्हणे जो आपुले ॥ १ ॥

तोचि साधू ओळखावा ।
देव तेथेचि जाणावा ॥ २ ॥

मृदू सबाह्य नवनीत ।
तैसे सज्जनांचे चित्त ॥ ३ ॥

ज्यासि अपंगिता नाही ।
त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥

दया करणे जे पुत्रासी ।
तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥

तुका म्हणे सांगू किती ।
त्याचि भगवंताच्या मूर्ती ॥ ६ ॥

**रचना: संत तुकाराम**

© BMM Copyright 2013. All rights reserved.

# अ ३ - समर्थ रामदास व कल्याणस्वामी



महाराष्ट्र राज्यात सातारा नावाचा जिल्हा आहे. त्याच्याजवळ सज्जनगड नावाचा गड आहे. फार फार वर्षांपूर्वी त्या गडावर रामदासस्वामी नावाचे संत राहत होते. त्यांच्यासोबत त्यांचे शिष्य सुद्धा राहत असत. कल्याण नावाचा शिष्य रामदास स्वामींचा अतिशय लाडका होता. तो अभ्यास करत असे पण त्याचबरोबर पुष्कळ काम करत असे. इतर शिष्य शिकण्यात जास्त वेळ घालावीत असत.

सज्जनगडावर तेव्हा पाण्याची सोय नव्हती. लांबून पाणी भरून आणावे लागत असे. कल्याण हे काम अतिशय आवडीने आणि निष्ठेने करत असे. मात्र काम करण्याच्या वेळेत त्याचा अभ्यास बुडत असे. तो इतर शिष्यांइतका अभ्यासासाठी वेळ देऊ शकत नसे. असे असले तरी रामदास स्वामींना कल्याणविषयी विशेष कौतुक वाटत होते. ते पाहून इतर शिष्य मात्र नाराज होत. त्यांना वाटे की आपण इतका वेळ नियमाने अभ्यास करतो, तरीदेखील आपल्या गुरूला कल्याण जास्त आवडतो! रामदास स्वामींच्या ही गोष्ट लक्षात आली.

एक दिवस नेहमीप्रमाणे रामदास स्वामी त्यांच्या शिष्यांना शिकवत होते. शिकवताना कल्याण तेथे नव्हता. नंतर रामदास स्वामींनी त्यांच्या शिष्यांना एक प्रश्न विचारला. तो प्रश्न कठीण होता. कोणालाच त्याचे उत्तर देता आले नाही. इतक्यात कल्याण तिकडून जात होता. रामदास स्वामींनी त्याला बोलावले आणि त्याला तो प्रश्न विचारला. काय आश्चर्य! कल्याणला त्या प्रश्नाचे अचूक उत्तर देता

© BMM Copyright 2013. All rights reserved. 

आले. इतर शिष्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी रामदास स्वामींना विचारले, “कल्याण तर पूर्ण वेळ शिकायला नसतो. त्याला एवढ्या कठीण प्रश्नाचे उत्तर कसे काय देता आले?” तेव्हा रामदास स्वामी म्हणाले, “कल्याण जरी थोडा वेळ काम करत असला तरी तो जे शिकतो ते आचरणात आणतो. तो काम करतो आणि काम करताना त्याला तुमच्यापेक्षा अधिक शिकायला मिळते. म्हणून केवळ पुस्तकी ज्ञान शिकून उपयोग होत नसतो. त्याला आचरणाची जोड हवी. आपण जे काम करतो त्या कामावर आपली निष्ठा हवी.”

हे ऐकून शिष्यांना त्यांची चूक लक्षात आली. कल्याण वेगळा का आहे हे त्यांच्या ध्यानात आले. तेव्हापासून त्यांच्या मनात कल्याणविषयी आदर वाढला.

कल्याण व रामदास स्वामी यांची गुरु-शिष्य म्हणून प्रसिद्ध जोडी आहे. त्यांच्या इतर अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत.

मुलांना रामदास स्वामींच्या अजून गोष्टी जमा करायला सांगावे.

रामदास स्वामींची माहिती खाली दिली आहे. ती मुलांना सांगावी. मुले ही माहिती स्वतः वाचू शकतील.

## समर्थ रामदास - थोडक्यात माहिती

समर्थ रामदास एक संत होते. ते सतराव्या शतकात होऊन गेले. साधारण त्याच काळात छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम होऊन गेले.

समर्थ रामदासांचा जन्म रामनवमीच्या दिवशी झाला होता. त्यांचे मूळचे नाव नारायण होते. रामदास लहान असतानाची एक गोष्ट प्रसिद्ध आहे. ते एकदा कुठेच सापडत नव्हते. त्यांची आई त्यांना सगळीकडे शोधून आली. शेवटी ते एका कपाटाच्या आत बसलेले सापडले. ते डोळे मिटून ध्यान करीत बसले होते. जेव्हा त्यांना विचारले की, “नारायणा, अरे काय करतो आहेस?” तेव्हा त्यांनी काय उत्तर दिले माहिती आहे? ते म्हणाले, “चिंता करीतो विश्वाची!”

वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी घर सोडले. ते पायी प्रवास करत नाशिकला पंचवटीला आले. नंतर एक तप म्हणजे बारा वर्षे त्यांनी कडक तप केले. ते रोज

© BMM Copyright 2013. All rights reserved. 

पहाटे उठत, व १२०० सूर्यनमस्कार घालीत. रोज गायत्री मंत्राचा व रामनामाचा जप करीत. त्यांनी रामनाम मंत्राचा १३ कोटी वेळा उच्चार केला होता. रामदासांचे गुरू प्रभू श्रीराम होते.



नंतरचे एक तप रामदास पूर्ण भारतात फिरले. त्यांनी जागोजागी हनुमानाची देवळे बांधली. हनुमानाच्या देवळात ते तरुणांना एकत्र करत, व त्यांना व्यायाम शिकवत. व्यायाम, उपासना, व अभ्यास ह्या तीन गोष्टींवर रामदासांनी भर दिला.

रामदास होते त्याच काळात शिवाजी राजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. असे स्वराज्य निर्माण व्हावे याकरीता रामदास त्याआधी गावोगावी फिरले. गावातील लोकांशी ते बोलले. रामदासांनी स्वराज्याचा पाया भक्कम तयार केला.



"जय जय रघुवीर समर्थ" हे वचन रामदासांनी प्रसिद्ध केले. लोकाना सहज समजेल अशा भाषेत त्यांनी "दासबोध" हा ग्रंथ लिहीला. चार ओळींचे कळायला व म्हणायला सोपे असे "मनाचे श्लोक" लिहीले. अतिशय सुंदर "भीमरूपी" मारुती स्तोत्र लिहीले. आपण नेहमी म्हणतो अशा कितीतरी आरत्या स्वतः रामदासांनी लिहिल्या आहेत. उदा. 'सुखकर्ता दुखहर्ता', 'लवथवती विक्राळा', 'दुर्गे दुर्घट', 'सत्राणे उड्डाणे' इ.

© BMM Copyright 2013. All rights reserved. 

नंतरच्या काळात शिवाजीराजांच्या विनंतीवरून रामदासस्वामी सज्जनगडावर येऊन राहिले होते.


तुम्हाला जमले तर तुम्ही सज्जनगडावर नक्की जा. समर्थ रामदास स्वामी कोण होते हे तुम्हाला सज्जनगडावर जाऊन जास्त चांगल्या प्रकारे कळेल. सज्जनगड तुम्हाला खूप आवडेल!



**माहितीसाठी:**

1. मुलांना रामदास स्वामी कोण होते हे कळावे हा हेतू आहे. एखादी गोष्ट सांगून नंतर त्यांच्याविषयी माहिती सांगितली तर मुले अधिक रस घेऊन ती ऐकतील.
2. मुलांना रामदास स्वामींवर आधारीत एक प्रकल्प करायला सांगा.
3. राम नवमीला “मनाचे श्लोक पाठांतर” किंवा “रामदास स्वामी कथा” अशा प्रकारच्या सोप्या स्पर्धा आयोजित करा.
4. मुलांना खालील नकाशा पाहून त्यांना काय समजले ते सांगू दे.

© BMM Copyright 2013. All rights reserved.




अ ४ - महाभारत

महाभारत हे एक महाकाव्य आहे. <u>महाकाव्य</u> म्हणजे खूप मोठं काव्य. आपण कल्पना करू शकू त्यापेक्षा ते कितीतरी मोठं आहे. महाभारतात किती श्लोक असतील कल्पना करा बरं. महाभारतात एक लाखाहून जास्त श्लोक आहेत.

महाभारत महर्षी व्यासांनी सांगितले आणि गणपतीने लिहिले. महाभारतात पुष्कळ लहान मोठ्या <u>अद्‌भुत</u> गोष्टी आहेत. आपल्या जीवनात घडू शकणारा प्रत्येक प्रसंग महाभारतात गोष्टीच्या रुपात सापडतो. म्हणून महाभारतातल्या गोष्टींनी करमणूक तर होतेच पण जीवनाचा बोध सुद्‌धा मिळतो.

आपण आता जी गोष्ट वाचणार आहोत त्यात अर्जुन आहे, द्रोणाचार्य आहेत, कौरव आणि पांडव आहेत. पांडव म्हणजे पांडू राजाची मुले. पांडव पाच होते. अर्जुन एक पांडव होता.

पांडू राजाचा मोठा भाऊ धृतराष्ट्र होता. त्याच्या मुलांना कौरव म्हणत. कौरव शंभर होते. म्हणजे पांडव आणि कौरव एकमेकांचे चुलत भाऊ होते.

© BMM Copyright 2013. All rights reserved.

महाभारतात पांडव आणि कौरव यांच्यात घनघोर युद्ध झाले. पांडव धर्माच्या बाजूने लढले. युद्धात पांडव जिंकले, सर्व कौरव मारले गेले.

कौरव-पांडव लहान असतानाची एक गोष्ट आहे. गुरू द्रोणाचार्य त्यांना शिक्षण देत होते आणि कौरव-पांडव शिकत होते. भीम आणि दुर्योधन गदा युद्धात तरबेज झाले. मात्र धनुष्यबाणाची विद्या सर्वांना यायला हवी होती. धनुष्याला बाण जोडायचा आणि सांगू तिथे अचूक बाण सोडायचा याला खूप महत्त्व होते.

एक दिवस द्रोणाचार्यांनी सर्व शिष्यांची नेमबाजीची परीक्षा घेण्याचे ठरवले. परीक्षेचा दिवस ठरला. परीक्षा घेण्यासाठी सर्व लोक मैदानावर जमले. द्रोणाचार्यांनी मैदानात एका झाडावर एक मातीचा पोपट टांगून ठेवला. त्यांनी शिष्यांना झाडावर पोपट दाखवला आणि म्हणाले, “बरोबर नेम धरून या पोपटाचा डोळा तुम्ही फोडायचा आहे.”

असे सांगून त्यांनी प्रत्येकाला जवळ बोलावलं आणि नेम धरायला सांगितलं. “झाडावर तुला काय दिसते?” असा प्रश्न त्यांनी प्रत्येकाला विचारला. बहुतेकांनी ‘पोपट दिसतो, झाडाची पाने दिसतात, फळे दिसतात, फांद्या दिसतात' अशी उत्तरे दिली. यामुळे कोणाचाही पोपटाच्या डोळ्यावर नेम बसला नाही. शेवटी अर्जुनाची पाळी आली.

अर्जुनाने धनुष्याला बाण जोडला आणि नेम धरला. गुरुजींनी विचारले, “अर्जुना, तुला काय दिसत आहे?” अर्जुनाने उत्तर दिले, “गुरुदेव, मला झाड दिसत नाही, फांदी दिसत नाही, पोपट दिसत नाही, मला फक्त पोपटाचा डोळा दिसतो.” द्रोणांनी “शाबास” म्हटले आणि बाण सोडण्याची आज्ञा दिली. अर्जुनाने बाण सोडला. तो बाण बरोबर पोपटाच्या डोळ्यात घुसला आणि पोपटाचा डोळा फुटला. जमलेल्या लोकांनी कडकडून टाळ्या वाजवल्या. सर्वांना अर्जुनाचे फार कौतुक वाटले. कौरव मात्र अर्जुनाची अचूक नेमबाजी पाहून नाखूष झाले.

अर्जुन धनुर्विद्येत निपुण झाला. आपल्या अचूक नेमबाजीच्या जोरावर त्याने नंतर दौपदी स्वयंवर जिंकले, इंद्रदेवांकडून गांडीव धनुष्य मिळवले. त्याच्या धनुर्विद्येतील अलौकिक कौशल्यामुळे अर्जुन “धनुर्धारी" म्हणून प्रसिद्ध आहे.

© BMM Copyright 2013. All rights reserved. 

महाभारतात अशा कितीतरी व्यक्तिरेखा आहेत. त्या सर्व व्यक्तिरेखांचे आणि विविध प्रसंगांचे अतिशय सुंदर <u>वर्णन</u> महाभारतात केले आहे.

**माहितीसाठी :**

१. मुले ही गोष्ट स्वतः वाचू शकतील. तरीसुद्धा वरील गोष्ट व माहिती मुलांना आधी तोंडी सांगा. नंतर त्यांना ती वर्गात वाचू दे.

२. महाभारत काय आहे हे काही अंशी मुलांपर्यंत पोहोचवणे हा मूळ हेतू आहे. महाभारतामधील दुसरी एखादी गोष्ट मुलांना सांगितली तरी चालेल. अधिक गोष्टी सांगता आल्या तर अधिक चांगले. मुलांना ह्या गोष्टी ऐकायला खूप आवडते असा अनुभव आहे.

३. महाभारतातील मुख्य पात्रांची ओळख व्हावी हा उद्देश असेल तर गोष्टी सांगायला “नवनीत" प्रकाशनाची “अमर साहित्य" पुस्तक मालिका उपयोगी ठरेल. त्या मालिकेत महाभारताची ५ पुस्तके आहेत.

४. मुलांना त्यांच्या आवडीनुसार महाभारतातील गोष्टी गोळा करायचा छंद जोपासायला सांगा. त्यांना मजा येईल. मुले आजी-आजोबा, आई-बाबांकडून गोष्टी ऐकून जमवू शकतात. तसेच इतर पुस्तकात वाचून किंवा इतर ठिकाणी वाचून गोष्टी जमवू शकतात.

५. प्रत्येक गोष्टीतून आपण काहीतरी शिकतो, बोध घेतो. वरील गोष्टीतून मुले काय शिकली हे त्यांना विचारा.

६. ह्या धड्यात उल्लेख नसलेल्या परंतु महाभारतात असलेल्या इतर कोणत्या व्यक्ती मुलांना माहिती आहेत का ते विचारा.

७. एखाद्या कार्यक्रमात मुलांना वरील गोष्ट नाटीका स्वरूपात सादर करू दे.

८. ह्या धड्यात भाषेच्या दृष्टीने नवीन विशेषणे शिकायला मिळतात.

© BMM Copyright 2013. All rights reserved.

अ ५ - जत्रा

सियाच्या गावात जत्रा येणार होती. गेले बरेच दिवस गावातली सगळी मुले वाट बघत होती. सगळ्यांना जत्रा खूप आवडते. एक तर सगळे मित्र मैत्रिणी एकाच ठिकाणी भेटू शकतात आणि सगळी मजा एकमेकांबरोबर करू शकतात आणि मग पुढचे खूप दिवस काय काय मजा केली त्याची उजळणी करत राहतात.
ह्या वेळी तर सियाला अजून उत्सुकता आहे कारण आता तिची उंची पण वाढली आहे आणि तिला आकाश पाळण्यात बसता येणार आहे. ती आणि तिच्या मैत्रिणी खेळायला भेटल्या तरी जत्रेत काय काय करायचं त्याबद्दल गप्पा चालू होत्या मागचे काही दिवस.

एकदाचे जत्रेचे तंबू ठोकले गेले. आकाश पाळणा, आरसा घर, चक्रीपाळणा, रिंगणघोड्याचे चक्र, आपटगाड्या, नेमबाजीचे खेळ, फुगे फोडून खेळणी जिंकायचे खेळ आणि तऱ्हेतऱ्हेचे मजेदार खाऊ, खेळणी ह्यांनी सजलेल्या रंगीबेरंगी कनाती, मोठ्या आवाजात चालू असणारी गाणी आणि ह्या सर्वावर ताण करत इकडे तिकडे धावत, हसत, खिदळत असलेली खूप सारी मुलं आणि त्यांना फारसं न ओरडता एकमेकांशी गप्पा मारणारे आई बाबा आणि आज्जी आजोबा!! हे सगळं सियाला खूप आवडतं.

पण जत्रा ज्या संध्याकाळी सुरु होणार त्याच संध्याकाळी नेमका आला सियाला ताप !! आणि सिया इतकी हिरमुसली की तिला काही सुचेचना. ताप राहिला बाजूला आणि सिया फक्त आणि फक्त जत्रेतल्या मजेचाच विचार करत राहिली आणि मुख्य म्हणजे सगळ्या मैत्रिणी जाऊन मज्जा करून येणार आणि आपण मात्र इथे कडू औषध घेत असणार...
औषधाने ताप उतरला तरी आई काही लगेच बाहेर जाऊ देणार नाही आणि तोपर्यंत जत्रा निघून जाणार. एकदम पुढच्या वर्षी येणार !!

© BMM Copyright 2013. All rights reserved. 

शी!!! ह्या तापाला पण अगदी आत्ताच यायचं होतं. जरा जत्रा येऊन गेल्यावर आला असता त...र ? हूं !!!
पांघरुण घेऊन बिचारी सिया खिडकीतून बाहेर बघत राहिली. लांबवरून जत्रेतला आरडाओरडा, गाण्याचे, आनंदी चित्कार ऐकू येत राहिले.

रुसलेल्या सियाला मग झोप लागली. दुसरा दिवस असाच गेला. मात्र संध्याकाळी अचानक दरवाज्याच्या घंटीचा आवाज आला आणि सिया गोंधळून गेली. अरे...? हा तर सना, सई, मनवा, यश, रौनक ह्यांचा आवाज....

सिया ताडकन अंथरुणात उठून बसली. तेवढ्यात हसत खिदळत सगळं मित्रमंडळ आत आलं. कुणाच्या हातात फुगे, कुणाच्या हातात म्हातारीचे केस, कुणी जत्रेत जिंकलेलं मोठठं मऊ अस्वल....

सियाला एकीकडे सगळे भेटल्याचा आनंद तर झाला पण त्याच वेळेस त्यांनी किती मज्जा केली ह्याबद्दल ती खट्टू पण झाली... पण सईने तिला फुगा दिला, यश म्हणाला " तू आली नाहीस म्हणून मी तुझ्यासाठी खेळलो आणि हे अस्वल जिंकलं !!"

सगळे म्हणाले आणि आम्ही कुणीच आकाशपाळण्यात बसलो नाही... तू नव्हतीस म्हणून!! आपण सगळे पुढच्या वर्षी बसू!!

सियाला इतक छान वाटलं... इतकं छान वाटलं की ती ताप विसरली, औषध विसरली, इतकंच काय पण जत्रा सुद्धा विसरली !! सगळे एकदम हसायला आणि बोलायला लागले. थोडा वेळ गप्पा मारून सगळे आपापल्या घरी गेले. अजूनही जत्रेचे आवाज लांबवर येत होते. ती खिडकीतून बाहेर बघत होती पण आता तिच्याजवळ मऊ अस्वल होतं आणि आता ती हिरमुसली नव्हती.

कथा -सौ अश्विनी देवधर

© BMM Copyright 2013. All rights reserved.

१. सिया कसली वाट बघत होती?

२. सियाच्या मित्र मैत्रिणींची नावे काय ?

३. तुमच्या गावातल्या जत्रेची माहिती लिहा.

४. तुम्हाला जत्रेत सगळ्यात जास्त काय आवडतं ?

गाळलेल्या जागा भरा

१. एकदाचे जत्रेचे ...... ठोकले गेले.

२. ........ सियाला मग झोप लागली.

३. सिया ताडकन ......... उठून बसली.

४. सगळे म्हणाले, आम्ही कुणीच ......... बसलो नाही.

ह्या गोष्टीत असलेली क्रियापदे लिहा ( action words )

© BMM Copyright 2013. All rights reserved.

# परिशिष्ट: बाराखडी

## अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः

| <u>स्वर</u> | | <u>चिन्ह</u> |
|---|---|---|
| अ | | |
| आ | काना | ◌ा |
| इ | पहिली वेलांटी | ि◌ |
| ई | दीर्घ वेलांटी | ◌ी |
| उ | पहिला उकार | ◌ु |
| ऊ | दीर्घ उकार | ◌ू |
| ए | एक मात्रा | ◌े |
| ऐ | दोन मात्रा | ◌ौ |
| ओ | काना आणि एक मात्रा | ◌ो |
| औ | काना आणि दोन मात्रा | ◌ौ |
| अं | अनुस्वार | ◌ं |
| अः | विसर्ग | ◌ः |

© BMM Copyright 2013. All rights reserved.

| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ◌ा | ि◌ | ◌ी | ◌ु | ◌ू | ◌े | ◌ै | ◌ो | ◌ौ | ◌ं | ◌ः |
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खै | खो | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गै | गो | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घै | घो | घौ | घं | घः |
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चै | चो | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छै | छो | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जै | जो | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झै | झो | झौ | झं | झः |
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टै | टो | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठै | ठो | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डै | डो | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढै | ढो | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णै | णो | णौ | णं | णः |
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तै | तो | तौ | तं | तः |

© BMM Copyright 2013. All rights reserved.

| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ◌ा | ◌ि | ◌ी | ◌ु | ◌ू | ◌े | ◌ौ | ◌ो | ◌ौ | ◌ं | ◌ः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थै | थो | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दै | दो | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धै | धो | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नै | नो | नौ | नं | नः |
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पै | पो | पौ | पं | पः |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फै | फो | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बै | बो | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भै | भो | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मै | मो | मौ | मं | मः |
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यै | यो | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रै | रो | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | लि | लु | लू | ले | लै | लो | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वै | वो | वौ | वं | वः |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शै | शो | शौ | शं | शः |

© BMM Copyright 2013. All rights reserved. 

| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ◌ा | ◌ि | ◌ी | ◌ु | ◌ू | ◌े | ◌ै | ◌ो | ◌ौ | ◌ं | ◌ः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षै | षो | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सै | सो | सौ | सं | सः |
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | है | हो | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळै | ळो | ळौ | ळं | ळः |
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षै | क्षो | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञै | ज्ञो | ज्ञौ | ज्ञं | ज्ञ |

© BMM Copyright 2013. All rights reserved.

समाप्त




© BMM Copyright 2013. All rights reserved. 